म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय का.वा.
दा.क्र. १०८५
१०८५
BVBK-0401085
BVBK-0401085

Marathi Granth Sangrahalaya Thane
Little Literature -
1085

# १. तिळगूळ



रावबहादूर पोतनीसांचा तो भव्य चौसोपी वाडा समोर आला तरी चिंतामणीच्या डोळ्यांपुढे कोकणातील ते चंद्रमौळी घरकुल, त्याच्या ठेंगण्या दाराला ओठंगून निरोप देणारी आई, तिची पाणावलेली नजर आणि ओढलेली काया दिसत होती. ते बहुमोल शब्द तर कानांच्या तळघरात दबा धरून बसले होते.

'मणी, मनाला लावून घेऊ नको. वि[illegible]ला सामोरं जाण्यासाठी प्रसंगी घराला पाठमोरं व्हावं [illegible]वलीत विद्येचं

रोपटं वाढत नाही. जगाच्या उन्हा–पावसात ते अंग धरतं. तुम्ही विद्येला पाठ दाखवा, जग तुम्हाला पाठ दाखवील. तुम्ही विद्येचं स्वागत करा, जग तुमचं स्वागत करील.'

' विद्या–विद्या, ' मणी स्वतःशीच पुटपुटला–' विद्या, विद्या खराखुरा विद्यार्थी म्हणून मी रावबहादुरांकडे राहणार आहे, नाही का ?'

आणि तो रावबहादुरांच्या दिवाणखान्यात ओळखीच्या चिठ्ठी-निशी थडकला. समोरच्या आरामखुर्चीवर एक प्रौढ गृहस्थ [illegible] होते. मोठमोठ्या मिशा ते मधूनच कुरवाळीत. लाल लाल डो[illegible] मोठाले करीत. जाड भिंगांचा चष्मा नाकावर बसवीत. माथ्यावर[illegible] शेंडी झटकीत. भली मोठ्ठी जांभई देत हातातील वृत्तपत्र भुव[illegible] आठी घालून न्याहाळीत. मणीच्या मनात आले. ' जगातील सारी उग्रता यांच्या चेहऱ्याच्या आसऱ्याला येऊन राहिली आहे की काय ? आणि अशांच्या सावलीला आता आम्ही राहायचं म्हणजे झालंच! यांनी त्या उग्र लालसर डोळ्यांनी बागेत नजर टाकली, त[illegible] पांढऱ्याशुभ्र मोगऱ्याचीसुद्धा लालभडक जास्वंद होऊन जाईल. तरी पण त्याने धारिष्टय केलेच–

' आपण रावबहादूर पोतनीस ?'

' मग काय गावचा महार येऊन इथं आराम करतोय का ? ही सलामीची तोफ ऐकून मणीची छातीच दणकली.

' नाव काय तुझं ?'

' आई मणी म्हणते, पण खरं चिंतामणी. '

' उद्याची तुला चिंता नि म्हणे चिंतामणी नाव ! '

मणी मनात उत्तरला–' आहेच माझं नाव चिंतामणी. आज ना उद्या माझ्या आईचं मन मी खासच निश्चित करीन '

पण तो उघडपणे म्हणाला–

'आमच्या गावी नववीपर्यंतच शाळा आहे. तेव्हा दहावी व अकरावी इथं पुण्याला आपल्याकडे राहून करीन म्हणतो. पडेल ते काम करीन.'

'की करशील ते काम पडेल ? तुम्ही हल्लीची पोरं ! गोरा-गोमटा चेहरा नि ठीकठाक नखरा पाहून घ्या. दरिद्री म्हणवतोस नि ही कोरी सदरा–चड्डी काय आकाशातून पडली होय ?'

'ही फक्त मी बाहेर जाता-येता घालतो, म्हणून चांगली राहिलीय.'

'बाहेर जाताना ही नि घरात काय कुंभमेळा साजरा करतोस वाटतं ?'

मणीच्या जिभेवर उत्तर सळसळले. पण आईने बजावले होते, वडील माणसांना उलटून बोलू नको. ओठांच्या तिजोरीतील शब्दांची रत्नं अकारण उधळू नको.

'नांदणूक कैकाड्याची आणि मिजास बादशहाची ! म्हणे बाहेर एक अन् घरात एक ! आमचं असं आत-बाहेर काही नाही. एक खडकाला नि एक बुडख्याला !

BVBK-0401085
BVBK-0401085

मणीने फक्त मान खाली घातली

'आजपासून या घरात राहायचं. नी नाही. माझ्यासमोर या दिवाणखान्यात बसलेल– वाक्य पुरे होण्यापूर्वीच मणी दिवाणखान्याच्या बाहेर जाऊन उभा राहिला.

असा पहिला दिवस गेला. आणि या दिवसाच्या पावलावर पाऊल टाकूनच इतर दिवस जात होते ! गोष्टी क्षुल्लक असत. पण रावबहादुरांचे शब्द जणू तिखटाचा शिपकारा पिऊन बाहेर

पडत. ज्याला त्याचा फटकारा बसेल त्याला हृदयापर्यंत जळजळलेच पाहिजे.

त्या दिवशी मणी रावबहादुरांना सोवळे नेसून वाढीत होता. मणीने पोळीवर तूप वाढले तोच मिशांच्या कुंपणातून शब्दांचे शरसंधान झाले–

'अरे, केवढं थोरलं वाढलंस हे तूप? छान! तुझ्या काय बापाचं जातंय म्हणा!' मणी उमगला व पुढच्या पोळीला त्याने बेताची धार धरली पण पुन्हा रावबहादूर गरजले– 'अरे, केवढंसं वाढलंस तूप? छान! तुझ्या बापाचं जात होतं का?'

जेवण झाल्यावर मणीने आपले प्रगति–पुस्तक स्वाक्षरीसाठी पुढे केले. त्याच्या तुकडीत तो पहिला आला होता. 'तुकडीत पहिला नंबर आलाय माझा–' नकळत मणी बोलून गेला.

'चष्मा लावलाय मी. चारी तुकड्यांत आला का?'

'चारी तुकड्यांत तिसरा.'

'मग त्या पहिल्या नंबरची किंमत तितकीच. या रावबहादुराच्या अन्नावर पिंड वाढतोय तुझा. पुढच्या खेपेला चारी तुकड्यांत पहिला न आणशील तर मीठ तोडीन तुझं!' जिव्हेच्या झारीने तिखटाचा सडा शिंपला. मणीच्या हृदयात. आग आग झाली. मणीने तो दाह गिळून टाकला आणि चारी तुकड्यांत पहिला क्रमांक पटकावण्याचे ठरविले.

मणीला हळूहळू कळून चुकले की मिरच्यांचेच जेथे वावर आहे, त्यातून उसाची अपेक्षाच कशी करावी? कारण सरळ शब्दाला वाकडे उत्तर दिल्याशिवाय आणि धड्या गोष्टींना तेढे अस्तर घातल्याशिवाय गृहस्थ पुढे जायचाच नाही! तरी पण मणीने आपला शांतपणा सोडला नाही. कारण आईने सांगितले होते–

'विद्येचा प्रपंच करताना तिखटाचे गोड करून घ्यावे लागते. दोरखंडाचे रेशीम मानून घ्यावे लागते. काटयांना 'फुले' म्हणून संबोधावे लागते.'

—केवळ, म्हणूनच केवळ तो सारे सहन करी. सहनशीलतेचे कवच घालून दु:शब्दांचे वार झेलून घेई. तरी पण कधी कधी कटू शब्दांचा लत्ताप्रहार झाला की नेत्रांचे घडे उपडे होतात. पापण्यांच्या ऐलथडी पैलथडी पाणीच पाणी होते! जिभेला तिखट लागले तर नेत्रांतून निर्झर ठिबकतो आणि हृदयाला तिखट लागल्यावर त्या झऱ्याचा सागर होऊन जातो. जिभेचे तिखट साखरेने थांबते, मनाचे तिखट साखरेने वाढते, निदान मणीची तरी अशी स्थिती झाली होती.

एक संवत्सर उलटले. वर्षाच्या कबुतरावरील दिवसांची पिसे उपटीत काळाचा पारधी पुढे चालला होता. मणीच्या मनावरील कोमलतेची पिसे उपटीत रावबहादुरांचा कारभार पुढे चालला होता.

मध्यंतरी रावबहादूर आजारी पडले. मणी समोर आला की त्यांचा तोफखाना डागला गेलाच म्हणून समजा. पण त्या बाबतीत 'तुझं माझं जमेना नि तुझ्यावाचून गमेना' असे झाले होते. आजारपणात तर त्यांना क्षणोक्षणी मणी लागे. मात्र इतर सर्व इंद्रियांची क्षीण झालेली शक्ती वाचेत येऊन बसली होती. मणी त्यांचे सकाळसंध्याकाळ अंग रगडी; मग विचारी, 'आता हलकं वाटतंय का?'

'हलकं? आता अंग जास्तच जड वाटू लागलंय. तुझं रगडणं म्हणजे जशी काही गजेंद्राचीच मुसंडी. बाबा रे, मीच—मीच म्हणून सहन करतो. एखादा सुदामदेव असता तर चुरडूनच जाता!'

'मग उद्यापासून बंद करू का? त्रास होत असला तर—' मणी मिस्किलपणे विचारी.

'त्रास ? तुझ्यापासून इतर काय कमी त्रास पोचताहेत. म्हणून एवढ्यानेच तो कमी व्हायचाय ? मणाचा गाडा मुठीनं थोडाच रिता व्हायचाय ?'

औषध द्यायच्या वेळी मणी कुठे अभ्यासात निमग्न असला तर रावबहादूर ठणठणायचे– 'चित्या, गद्धया–औषध द्यायच्या वेळी पुस्तकात दडचा देतोस ? अभ्यासात बुड्या मारतोस ? आणि मी इथं काय करू ? औषध द्यायला तुझ्या बापाला स्वर्गातून बोलावू ? की त्याच्या हातचं प्यायला मीच स्वर्गात जाऊ ?'

अंग शहारून मणी पुस्तक भिरकावी व औषध द्यायला धावे ! अर्थात त्या तसल्या वक्तव्यामुळे औषध घेऊन जो कडवटपणा रावबहादुरांच्या मुद्रेवर येणार नाही तो कडवटपणा मणीच्या मुद्रेवर ठाण मांडून बसे !

तरी पण मणी अनुभवाने ओळखून होता, की केवड्याला काटे असले तरी सुगंधही आहे ! अग्नीला दाह असला तरी ऊबही आहे ! म्हणूनच दहावीतून चारी तुकड्यांत पहिला क्रमांक पटकावून मणी अकरावीत गेला. तेव्हा रावबहादुरांनी मणीला भारी पैकी झरणी घेऊन दिली. पण ती देताना–

'मी लेखणी दिलीय तुला. आमचं वळण बिघडवू नका. नाही तर लिहाल काहीतरी चवचाल नि चवंढाळ, आणि सोन्याच्या कुंभातून शेणखळा शिपाल !' अशी जहाल पुस्ती जोडण्याला कमी केले नाही. लवकरच मणीच्या शाळेचे स्नेहसंमेलन आले. त्याने नाटकात काम केले होते. शाळेत जाताना तो रावबहादुरांना म्हणाला,

'मला बक्षिसं मिळायची आहेत आणि मी नाटकात कामही करणार आहे. येणार ना बघायला ?'

'रोज तुझा नाटकीपणा बघतोच आहे, तो स्टेजवर आणखी वेगळा कशाला बघायला हवा ?' वक्रतेने उत्तर न येते तर ते राव-बहादूर कसचे ! अशोकपर्णांच्या कडांची वक्रता जेवढी स्वाभा-विक असते तेवढीच काही माणसांच्या स्वभावातील वक्रता स्वाभा-विक असते. रावबहादुरांचा पिंड असाच घडला होता ! अर्थात एवढं उफराटं बोलूनही प्रेक्षकांत त्यांची पगडी दिसली, तेव्हा मणी सर्द झाला. घरी आल्यावर न राहवून त्याने विचारले,

'आला होतात संमेलनाला– ?'

'होय !' मिशा कुरवाळीत रावबहादूर बोलले, 'म्हटलं आम्ही नाही म्हटलं, तरी तुम्ही स्टेजवर जाऊन नंगानाच घालणार ! कसलं वेडंवाकडं घाणेरडं काम दिसलं असतं तर तिथेच स्टेजवर चढून दिली असती श्रीमुखांत. पण कीचक वधातल्या भीमाची भूमिका तुला करताना पाहून–'

'धारिष्टय झालं नसेल !' मणी मनात म्हणाला व उघडपणे म्हणाला, 'भीमाची भूमिका पाहून काय वाटलं ?'

'भूमिका पाहून असं ठरवलं की त्या एवढ्या थोरल्या धिप्पाड कीचकाला धरून तू आपटलास मग आपलं चार माणसांचं धुणं आपटणं म्हणजे तर तुझ्या हाताचा मळ !'

–असली बोलणी म्हणजे मात्र रावबहादुरांच्या जिभेचा मळ होता हेच खरे !

एक दिवस शालेय वादविवाद मंडळातर्फे शेवटच्या तासाला जोडून महामहोपाध्याय पोतदारांचे व्याख्यान झाले. चार–दोन मुलेही बोलली. विद्यार्थी-प्रतिनिधी म्हणून मणीचे मोठे चटकदार भाषण झाले. अर्थात त्याला घरी यायला तिन्हीसांजा झाल्या. घरी येताना चांगले भाषण केल्याबद्दल अध्यक्षांकडून मिळविलेल्या

शाबासकीच्या आनंदापेक्षा आता रावबहादुरांकडून कसली शाबासकी (?) मिळेल या कल्पनेच्या दुःखानेच मणीचे काळीज कातरू लागले होते. मणीच्या अभावी रावबहादुरांची संध्येची तयारी केली गेली नसल्याने ते रागारागाने ओसरीवर येरझारा घालू लागले. मिश्यांना पीळ भरू लागले. भिवया उंचावू लागले. अंगणातील मोत्यावर गुरकावू लागले आणि एकदाचा मणी आला.

त्याला ओसरीच्या पायऱ्या चढू न देता ते गुरगुरले. ‘ चित्या, शाळा सुटून दोन घंटे झाले तरी कुठले उकीरडे फुंकत होतास ? ’

‘ शाळेत व्याख्यान होतं.’

‘ मग इथं माझी संध्येची तयारी करायला शाळेचा गडी धाडायचा होतास. राहा उभा आता असाच रात्रभर अंगणात. न विचारता उशीर केलास नाही का ? मी म्हटलं की मोटारखाली चिरडलास, का टांग्याखाली भरडलास ? मला नाही पण तुझ्या आईला तर तुझं सुतक कळवायला पाहिजे ना ?’

मणी बोलला नाही. जीभ बोलू पाहत होती पण तेवढ्यात कुठल्याशा दूरदूरच्या खोपटाच्या दारातून शब्द उमटले, ‘ विद्येचे लेणे घडवताना प्रसंगी अवमानाचे देणे सोसावे लागते ! विद्येचे चंदन जमवताना अभिमानाचे घर्षण सोसावे लागते !’ म्हणूनच मणीने मान खाली घातली व तो पायरीशी तसाच उभा राहिला.

रस्त्यावरची वर्दळ आणि अंगणातील प्रकाशशलाका हळू हळू मंदावत गेली. अंधाराच्या घोंगडीत दिवस गुडुप झाला. बागेतील पाखरांचा थवा पानांच्या पांघरुणांत विसावला. अष्ट-दिशांच्या चबुतऱ्यावर ताऱ्यांचे पहारे सुरू झाले. मणीला वाटले, ‘ आपल्याप्रमाणेच या ताऱ्यांना आकाशात यायला उशीर होतो. म्हणून रोज रात्रभर खडे राहण्याची सजा मिळते काय यांना ?

तेवढ्यात रावबहादुरांच्या खाकरण्याचा आवाज आला. 'चित्या, चल घरात. उद्या गारठ्यात काकडून निपचित पडलास तर डॉक्टरच्या पायी माझ्याच खिशाला बूड यायची.'

'किनई, माझं भाषण होतं–मी वादविवाद मंडळाचा चिटणीस आहे ना ? मग मला कसं घरी निघून येता आलं असतं ?'

'गाढवा, मघाशी हे सांगायला दातखीळ उचकता येत नव्हती? त्याबद्दल शिक्षा म्हणून पाच ऊठाबशा काढा नी व्हा घरात.' या खुराकावरच मणी प्रवेशपरीक्षा उत्तीर्ण झाला. एकीकडे टंकलेखन व लघुलेखनही तो शिकला होता. पतीचे वा अन्य कुणाचेही छत्र नसलेल्या आईने उतारवयात लोकांचे काबाडकष्ट उपसणे मणीला पसंत नव्हते. अर्थात त्याने हरप्रयत्न करून राव-बहादुरांच्या वशिल्याने चांगलीशी नोकरी मिळवली. त्यांच्याच ओळखीने एक छोटीशी खोलीही मिळवली व तो आईला कोक-णातून घेऊन आला.

रावबहादुर कसेही वागले असले, वा काहीही बोलले असले तरी विद्येविना वणवणणाऱ्या मणीला त्यांनीच माणसात आणून बसवले होते हे मणी विसरला नव्हता ! डोंगराच्या वरून मुरु-माची भरती आली असली तरी पोटी स्नेहाळ जलवंती पाझरत असते. तशीच गूढ सहानुभूती त्या खडकाळ वागणुकीतून ओहळत होती हे मणी जाणून होता. वरच्या नरोटीकडे न पाहता आतल्या खोबऱ्याकडे पाहूनच श्रीफळाची जवळीक करायची नसते का ? मणीने पहिला पगार आल्याबरोबर सुवर्णाची मुद्रिका घडविली. एक जरीची धोतरजोडीही खरीदली आणि मग तो रावबहादुरां-कडे गेला.

त्या जिनसा त्यांच्या पुढे ठेवून मणी सद्गदित वाणीने म्हणाला ‘ हे म्हणजे फूल नाही फुलाची पाकळी ! क्षीरसागरातून दूध प्यायचं नी त्या दुधानं त्यालाच नैवेद्य दाखवायचा ! ’

‘ काय रे चित्या, ही माझी अशी सरबराई करून माझं ऋण एकदाचं फेडून टाकून हात झाडून मोकळं व्हायचंय वाटतं ?

‘ मोकळं ? इतर पाशांतून मुक्त होण्यात जेवढा आनंद त्यापेक्षा मायापाशांत निबद्ध होण्यात शतपट आनंद ! आणि पैशाचं ऋण फेडण्यात जेवढा आनंद त्यापेक्षा मायेचं ऋण वाढवण्यात शतपट आनंद. मायेचं ऋण नाण्यात फेडता आलं असतं तर जीवनाची बाजारपेठ झाली असती ! मायेचे दान मोहरात घेता आलं असतं तर संसार भाडोत्री होऊन गेला असता ! नाण्यांच्या चढउतारावर का कुठं नात्याची चढउतार अवलंबून असते ! शिवाय आपण जे सोन्यासारखं शिक्षण दिलंत, त्यापुढं हे सोनं म्हणजे पितळच ! ’

‘ मी सोन्यासारखं शिकवलं, ते मातीमोलाचं केलंस ! मूर्ख पोरा ! सगळा पगार असा परद्वारी ओतून पुनः चौपदरी हाती घ्यायची आहे का ?

‘ पण हे परद्वार नाही. हे तर माझं हक्काचं घर— मग माझ्या पहिल्या पगारावर आपल्याइतका जगात कुणाचा बरं हक्क पोचतो? जो रोप राखील, तोच फळ चाखील होय ना ? ’

‘ पुरे झालं तुझं ते वाङ्मयात बोलणं ! मी हा असा गद्य माणूस ! चंद्राचं चांदणं बैलाच्या अंबोणात कशाला घालतोस ? ’

‘ खरंच आपल्याजवळ आज मी एक गोष्ट मागायला आलोय ! ’

‘ वाघ्याचा पाग्या झाला, तरी मूळ स्वभाव जात नाही ना तुझा ? शिकवलं, पोटाला लावून दिलं— घर पाहून दिलं— अजून तुझा मागरेपणा आहेच. या रावबहादुराला पुरता लुटून घे. माझ्या

खिशाला पूर्वी भोकं होती. तू आल्यापासून त्याला भगदाडं पडायला लागली. आता अजून मागणी आहेच! म्हणजे आता खिसा कापून द्यायचाच तेवढा बाकी राहिला आहे.'

'मी दुसरं काही मागत नाही. मी आपल्याला काही देणार आहे त्याचा मोबदला म्हणून–'

'मग आजवर तरी हरामाचं कुठं घेतलंस? तू कपडे फाडावेस, मी मोबदला म्हणून नवे शिवावे! तू छातीच्या फासळ्या दाखवाव्या, मी मोबदला म्हणून बदामाच्या वड्या चाराव्या! तू आंतरशालेय खेळात धडपडावे, मी मोबदला म्हणून डॉक्टरचं बिल भरावं! तू शेजाऱ्यांचे पाड गोफणावे, मी मोबदला म्हणून त्यांच्यापुढ क्षमेसाठी दात विचकावे!'

'पुरे ना! समुद्राच्या उड्या अन् पोरांच्या खोड्या कधी मोजता येतात का! मात्र आज जी गोष्ट मी आपल्याला देणार आहे त्याचा मोबदला आपण मला दिलाच पाहिजे, द्याल?'

देतो, या घराचं बक्षिसपत्र मागत असलास तरी संन्यास घेऊन नंगा फकीर होऊन हिमालयात जातो. कशाचा मोबदला हवाय चित्या?

मणीने बरोबर आणलेल्या पिशवीतून घाईघाईने एक वडी काढली व ती रावबहादुरांच्या हातात ठेवीत तो म्हणाला, 'आज संक्रात! तिळगूळ घ्या नि–'

★ ★ ★

# २. पहिला दिवस



ओहोऽ! आज पहिला दिवस. जयाचा शाळेत जाण्याचा आज पहिला दिवस. तिच्यापेक्षा पाचसहा वर्षांनी वडील असलेल्या,

मराठी चवथीत ताईगिरी गाजविणाऱ्या वाड्यातल्या कमूअक्काचे बोट धरून ती घरून निघाली.

धाटणीच्या गुलाबी साटणीच्या झग्याची शोभा, पाठीवरच्या नागबाळांत द्वंद्व चालले जोसांत, कानांच्या शिंपल्यात माणिक-मोत्यांची बरसात, अरुण लपलेला ओठांत, किरण दडलेला डोळ्यात, पायात तोरड्या गुणगुणत, हातात बांगड्या किणकिणत, नवी पाटी, नवी पट्टी, नवी लेखणी, नव्या सांगातिणी. क्षणात चिमुकले काळीज सश्याच्या भीरुतेने धडधडे, तर क्षणात चिमुकले काळीज मोराच्या उल्हासाने फडफडे. पळांत घशाशी धास्तीचे बांध दाटत तर पळात घशाशी मस्तीचे निर्झर उफाळत. अशा थाटात चालली होती जया शाळेत, कारण आज शाळेत जाण्याचा पहिला दिवस!

कमूअक्का अनुभवाची माहिती पुरवीत होती. 'अग जया, आपल्या शाळेचे मैदान किती छान आहे! दोरीवरच्या उड्या, डंबेल्सच्या जोड्या, घसरगुंड्या, झालंच तर झोपाळ्यावरच्या...' पण तिच्या त्या झोपाळ्यावर कल्पनेने बसायलासुद्धा जया तयार नव्हती. तिचा चिमणा मेंदू वेगळ्याच हिंदोळ्यावर आंदोलत होता.

ती एकदम थांबली व म्हणाली,

'आमच्या थोरल्या बाई कशा आहेत ? '

'अग किनई, त्या थोड्याशा रागीट आहेत.'

'रागीट म्हणजे मारकुट्या ? ' जयाने श्वास रोखून विचारले.

'अग, सांगू का– त्या वाईट मुलींशी रागीटपणे वागतात. कधीमधी मारतात. अग, त्या जोश्यांच्या विमलीला बाईंनी सात आठ वेळा छडी मारली. बरं झालं, छान झालं. मला ती सागर-गोटे देत नाही काय– कशी जिरली एका माणसाची.'

'कमूअक्का, तुला नाही ना ग त्या कधी मारीत ?' कमूअक्काचा हात घट्ट धरून जया भेदरल्या आवाजात विचारती झाली.

'मला ?' रस्त्यातल्या ढिकळावरून टुणकन् उडी मारीत कमूअक्का म्हणाली, 'तसं...तसं... एकदोनदा त्यांनी मला मारलं होतं...'

'कशाबद्दल ग ?' जयाने भिवया उंचावल्या.

'अग, किनई, त्या दिवशी शाळा होती दुपारी. आई करंज्या करणार होती आणि मग मला बाई राहवेना. मी पळाले मधल्या सुट्टीतच पाटीदप्तर घेऊन आणि दुसऱ्या दिवशी मारली छडी बाईंनी, पण त्या विमलीसारखी सप्पदिशी नाही काही ! अगदी हळू. विमलीला किनई तुमचे अण्णा टॉमीला पिटतात ना, तशी लगावतात. अय्या ! कशी होते एका माणसाची फ–"

त्यानंतर जयाला काय झाले कुणास ठाऊक ! तिने कमूअक्काचे बोट जे घट्ट धरले ते शाळा येईपर्यंत सोडले नाही आणि पुढच्या रस्त्यात एक प्रश्नही विचारला नाही. एरवी वारेमाप बडबडणाऱ्या जिभेने एक शब्दही उच्चारला नाही ! कमूअक्का मात्र एकटीच तिला आपल्याला असले–नसलेले ज्ञान पाजण्याच्या प्रयत्नात होती.

'बरं का जया, ती बघ शाळा दिसायला लागली. ते मैदान, ती हिरवी हिरवी हिरवळ बघितलीस ? खो खो खेळायला काय मज्जा येते पण. आणि त्या मागच्या कुंपणावरची दिवसमावळी बघितलीस. शाळा सुटायच्या वेळी फुलंच फुलं उमलतात तिच्यावर. आपण गजरे करू हं संध्याकाळी आणि ते चिंचेच झाड बघितलंस ?

पाणी प्यायच्या सुट्टीत चिंचा पाडायला इतकी जमाडी-जंमत येते. तू येशील ?'

जयाने तिच्या या प्रश्नावर काहीच उत्तर दिले नाही. तिच्या त्या चिमुकल्या हसऱ्या नेत्रांवर कृष्ण-कमळाच्या फुलांवर सायं-तळीच्या शामल छटा उमटाव्या तशा उदास छटा उमटल्या होत्या. तिच्या लालचुटुक ओठांची ती जोडी, जास्वंदीच्या कळयांची ती जुडी कसल्याशा उद्वेगाने मुडपली होती. कमूअक्का तिला अंगुलीनिर्देश करीत एकेक गोष्ट दाखवीत होती पण तिचे चित्त त्या कशातच नव्हते. शाळेची ती हांकेच्या अंतरावर आलेली टुमदार दगडी इमारत, ते हिरवे हिरवे मैदान, ती छोटी छोटी बाग, त्यातली इवली इवली फुले, त्या लहान लहान पोरी. एरवी जया नाचतच सुटली असती ते पाहून. पण आता मात्र त्या इमारतीतून, बगीच्यातून, फुलांतून, मुलींतून आजपर्यंत कधीच न बघितलेल्या थोरल्या बाई तिला दिसू लागल्या. आजपर्यंत कधीच न अनुभवलेल्या छड्या ऐकू येऊ लागल्या ! धुक्याच्या झोतात जुईची कळी गुदमरावी तसा तिचा चिमणा जीव अनामिक भीतीने गुदमरू लागला. अनामिक काळजीने खंतावू लागला. तेवढ्यात शाळेची इमारत आली आणि जया आयुष्यात पहिल्यांदाच आत शिरली. ज्या शाळेशी गट्टी करायची तिच्याशी गट्टी फू करावेसे तिला वाटू लागले. ज्या शाळेच्या गळ्यात गळा घालायचा, तिलाच पाहून गळा काढावासा वाटू लागला.

तिच्या वर्गाच्या दाराशी तिला सोडून कमूअक्का म्हणाली—

' जया, हा तुझा वर्ग बरं का. मी पाणी प्यायच्या सुट्टीत तुला भेटायला येईन. घंटा होऊन गेलीय. मधल्या सुट्टीत तुझी आई नाव घालायला येणारच आहे. आता मी माझ्या वर्गात जाते हं.

नाही तर थोरल्या बाई...' पुढचे शब्दा कमूअक्काने न उच्चारताच जयाने ओळखले व नाइलाजाने इतका वेळ घट्ट धरलेले कमूअक्काचे बोट सोडून वावटळीत फांदीपासून नाइलाजाने दूर होणाऱ्या कोवळ्या काकडीप्रमाणे ती कमूअक्कापासून दूर झाली! आलेला आवंढा गिळून ती महत्प्रयासाने म्हणाली–

'मी एकटीनंच जायचं या वर्गात !'

पण तिच्या प्रश्नाला उत्तर द्यायला कमूअक्का होतीच कुठे तिथे ? दुरूनच तिने थोरल्या बाईंचा दरडावणीचा शब्द ऐकला होता आणि म्हणून जयाचे बोट सोडून तिने वर्गाकडे सूंबाल्या केला होता !

आता मात्र जया अगदी एकटी एकटी राहिली ! अजूनही ती मुखस्तंभासारखी वर्गाच्या दारातच उभी होती. आत तिला अनोळखी पण तिला समवयस्क अशा पोरींची बागेतल्या चिमण्यांप्रमाणे चिवचिव चालली होती. तेवढ्यात कोणीसे वर्गाच्या बाहेरील सज्जातून ओरडले–

'ए पोरी, घंटा झाली तरी वर्गाच्या बाहेर काय उभी आहेस. कान नाहीत का तुला ? चल, नीघ आत. मूर्ख नाही तर !'

बाप रे ! मुसळधार पावसाच्या पहिल्याच सरीने भुईतून नव्याने अंकुरणारा कोंब हबकावा, तशी जया हबकली. कसाबसा जीव संभाळून ती वर्गात शिरली. त्या गडबडीत तिची पट्टी पडली, पेन्सिल जमिनीवर पडून तिचे तुकडे तुकडे झाले, डोक्यातले आईकडून हट्टाने घालून घेतलेले मोगऱ्याचे फूल निखळून त्याच्या पाकळ्या जमिनीवर विखुरल्या; पण बावरलेल्या, भेदरलेल्या, घाबरलेल्या जयाला त्या गोष्टीचे भानच राहिले नाही ! जयाला घडलेली सलामी ऐकून इतका वेळ सावळा गोंधळ घालणाऱ्या

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय

आतल्या मुलीसुद्धा चिडीचीप झाल्या होत्या. जया वर्गात शिरली. पाखरांच्या थव्यात नव्याने शिरलेल्या पाखराकडे इतर पाखरांनी पाहावे, त्या कुतूहलाने त्या पोरी नवागत जयाकडे पाहत होत्या.

ठसठशीत बांध्याची, लुसलुसीत चेहऱ्याची, चुणचुणीत चालीची आणि झगमगीत पोषाखाची ही नवीन छोकरी प्रथमदर्शनीच वर्गातल्या पोरींना मोठी लोभनीय वाटली. त्यांतल्या दोघी-तिघींनी तिला धिटाईने हाकदेखील मारली.

'ए शुक्, इकडे ये की बसायला.' बापट म्हणाली.

'माझ्याजवळ बघ जंमत आहे–' हातातले मोराचे पीस विलोभनार्थ दाखवीत कुंदा केळकरने तिला पाचारले.

'अग, तुमच्या आळीत कोपऱ्यावर तर आम्ही राहतो–' उषा जाधवने घसट केली.

'माझ्याजवळ ये ग.' वीणा परांजपे कुऱ्यात म्हणाली–'मी किनई कोण आहे माहीत आहे ?'

जयाने प्रश्नार्थी भुवया उंचावल्या.

'थोरल्या बाईची भाची. थोरल्या बाई माझी आत्या लागते–सख्खी आत्या '

बाप रे! फिरून थोरल्या बाईचा पाठलाग सुरू झाला म्हणायचा! जयाच्या विसरू पाहणाऱ्या भीतीने फिरून उचल खाल्ली. आणि मग त्या वीणापासून शक्य तितक्या दूर दूर...मग! ...मारकुट्या रागीट थोरल्या बाईची भाची नव्हती का? जया अगदी दूर कोपऱ्यात जाऊन बसली.

ती जागेवर बसायचाच अवकाश, पुढच्या बाकावरच्या दोन पोरींनी तिचे शेपटे पुढे घेऊन रिबिनी हाताळून बघितल्या.

शेजारच्या धिटुकलीने पाटीची किंमत चौकसली. पलीकडच्या एका चिटुकलीने तिची बांगडी काढून स्वतःच्या हातात घालून बघितली. मैत्रीचा दांडगा वशिला लावण्यासाठी एकीने स्वतःजवळची पेन्सिल तिला देऊ केली. दुसरीने स्वतःच्या पुस्तकातल्या दोन चांद्या जयाच्या मुठीत कोंबल्या. तिसरीने स्वतःच्या पुस्तकातली चित्रे तिला दाखवली. चौथीने आपल्या डोक्यातील फुलं तिच्या केसांत खोचली...आणि बिचारी जया...त्या वर्गात नव्यानेच--पहिल्यानेच आलेली-मुक्या वासराप्रमाणे--गरीब पाखराप्रमाणे साऱ्या गोष्टी मुकाटयाने, अगदी मुकाटयाने सहन करीत होती. एरवीची जया असती तर अनोळखी व्यक्तीने नखाला जरी हात लावला असता तरी ती गडाबडा लोळली असती, तडातडा बोलली असती, फडाफडा रागावली असती. पण आज--आजची जया निराळी होती ! मणामणांच्या ओझ्याने भारावल्याप्रमाणे आज तिचे हात चळवळ न करता स्वस्थ बसले होते. डिंकाने डकवलेल्या पाकिटा-प्रमाणे तिचे ओठ न बोलता गुपचूप बसले होते. अगदी बेलबागे-तल्या गरुडाप्रमाणे ती अचल, निस्तब्ध बसली होती. खेळण्याच्या दुकानातली मोठीशी बाहुलीच जणू. तिची उत्सुक, उतावळी नजर मात्र पोरींच्यावर भिरभिरत टेबलाकडे व टेबलाकडून दाराकडे वळत होती. कारण अजून बाई वर्गात आल्याच नव्हत्या.

कशा असतील बरं आपल्या बाई ? तिच्या चिमुकल्या मेंदूतून विचारांचे निर्झर ओघळू लागले. कशा बरं असतील आपल्या बाई ? आईसारख्या लाड करणाऱ्या, मावशीसारख्या खाऊ देणाऱ्या, आत्यासारख्या हसवणाऱ्या, दादासारख्या बक्षीस देणाऱ्या, बाबां-सारख्या शाबासकी देणाऱ्या, आजीसारख्या गोष्टी सांगणाऱ्या... कशा--कशा बरं असतील बाई ?

तेवढ्यात वर्गाच्या दाराशी चपलांचा आवाज झाला, आणि तिच्या प्रश्नांना चालतेबोलते मूर्तिमंत उत्तर मिळाले! वर्गात एक पोक्त स्त्री शिरली. त्या बाईच असल्या पाहिजेत. कारण मुली झटदिशी गुपचूप झाल्या आणि पटदिशी उभ्या राहिल्या. जयाही उभी राहिली.

'बसा खाली!' बाई गरजल्या. फांदीवरून खाली उतरणाऱ्या प्राजक्ताच्या फुलांप्रमाणे पोरी हलकेच खाली बसल्या. तेवढ्यात एका मिनिटात जयाने बाईंकडे चांगले निरखून पाहिले. राकट रंगाच्या, आडवट देहाच्या, जाड चष्म्याच्या, उग्र चेहऱ्याच्या त्या बाईंबद्दल का कोण जाणे, जयाचे एकदम प्रतिकूल मत होऊन गेले. या का आपल्या बाई? या का आईसारखे लाड करणार, मावशी-सारख्या खाऊ देणार, बाबांसारख्या शाबासकी देणार, आजी-सारख्या गोष्टी सांगणार? छे! छे! शक्यच नाही! शक्यच नाही!! या त्या थोरल्या बाईसारख्या छडी मात्र देतील! थोरल्या बाई! बाप रे!'

तेवढ्यात तिच्या शेजारची मुलगी तिलाच ऐकू येईल एवढ्या हलक्या आवाजात पुटपुटली—

'ए, या काही आपल्या बाई नाहीत काही. आपल्या बाई आज आल्या नाहीत म्हणून थोरल्या बाई आल्यात हजेरी घ्यायला.'

थोरल्या बाई! आणि हजेरी घ्यायला? हजेरीचा शालेय परिभाषेतील अर्थ जयाला अजून माहीत नसल्यामुळे तिने हजेरीचा वेगळाच अर्थ लावला, आणि आता तर ती मघापेक्षाही हात आवळून, मघापेक्षाही ओठ मुडपून, अंग आखडून बाकावर बसली. समोरच्या मासिक नोंदणीपत्रकात बघून बाईंनी उपस्थिती घेतली सर्वांची नावे झाली. पण जयाचे घातलेच नसल्यामुळे तिचे नाव

कोठून येणार ? एखाद्या मोठ्या ढगामुळे निळ्याभोर आकाशावर धूसर पटल चढावे त्याप्रमाणे मोठ्या बाईंच्या आगमनाने त्या आनंदी वर्गावर उदासवाणे पटल चढले होते ! मघाशी चिवचिवणाऱ्या सगळ्या चिमण्या आता गप्प झाल्या होत्या. मघाशी वळवळणारे सगळे हात आता घडी करून बसले होते. भिरभिरणारे सगळे पाय आता जुडी करून बसले होते ! मोठ्या बाईंच्या रूक्ष आगमनाने फुलपाखरांचे सुरवंट बनावे, तशी त्या वर्गाची स्थिती झाली !

मध्येच एखाद्याचे ठसकणे, खाकरणे, दप्तर चाळवणे ऐकू येई. तेवढाच जिवंतपणाचा आभास–आणि तोही जरा मोठ्याने झाला की बाई ओरडत--

'खोका, खोका मेल्यांनो, बेंबीच्या देठापासून खोका. सुट्टीत चोरून शाळेच्या चिंचा खायला हव्यात.' मधेच कुणाच्या पावलांची चाळवाचाळव झाली तरी बाई पुकारत– 'खबरदार कुणी जागेवरून हाललात तर–तंगडीच मोडून टाकीन एकेकीची! फार उंडारायला शिकलायत, बेशिस्तपणे वागायला शिकलायत. जगात वागायची काडीमात्र अक्कल नाही तुम्हाला !'...बाईंची तारसप्तकातील 'राग'दारीतील ध्वनिमुद्रिका चालू झाली. ओठ पिळले तर दूध निघेल असल्या त्या कोवळ्या पोरींना, आईच्या पंखांखालून नुकत्याच बाजूला झालेल्या त्या पाखरांना हा व्यवहाराचा दंडक का शिकवायचा ? आपण ज्या जगात वावरतो त्याची चिंता थोरांनी वहायची का पोरांनी ? पण...

बाई बडबडतच होत्या ! जया ज्या कोपऱ्यात बसली होती. त्या भिंतीच्या खिडकीतून जोराने वारा आत येत होता व त्यामुळे भिंतीवरची दिनदर्शिका जोराने फडफडत होती–तिचा आवरून

सावरून धरलेला फ्रॉक हालत होता–टेबलावरच्या वहीची पानेही सळसळत होती. जयाला वाटले, या रागीट बाई या अवखळ वाऱ्यालासुद्धा वर्गात कोंडतील, या बंडखोर कॅलेंडरला टरकावून टाकतील, त्या बडबड्या वहीला पिशवीत कोंडतील...गप्प बसायचे कळत कसे नाही यांना...?

तेवढ्यात थोरल्या बाई गरजल्या–

'ए, कोपऱ्यात बसलेल्या निळा फ्रॉकवाल्या नवीन मुली, उभी राहा पाहू.'

मारा जयावर होता! जया नाइलाजाने उभी राहिली. वादळात गदगदणाऱ्या नाजुक वेलीगत ती गदगदत होती.

'तुझं नाव काय ?'

'जया'

'सबंध नाव सांग.'

'सबंध नाव हो...' आधीच बावरलेली जया थोडीशी आणखीन बावरली. सबंध म्हणजे वडिलांचे नाव व आपले नाव...तिला आईने सांगितलेले आठवले. मग ती घसा खाकरून म्हणाली,–

'माझं सबंध नाव जया अण्णा विष्णुपंत हे गोडबोले.'

जाणत्या पोरींनी हसण्याची उबळ अळेबळे दाबली. एवढा वेळ रागीट दिसणाऱ्या बाई मात्र थोड्याशा हसतमुखी झाल्या व कढ आलेल्या भाताप्रमाणे खदखदत विचारत्या झाल्या–

'जया–अण्णा–विष्णु–हे गोडबोले! असलं कसलं चमत्कारिक ग तुझं सबंध नाव ?'

आता मात्र जया चिडली. अगदी खरी चिडली! थोरल्या बाई असल्या म्हणून काय झाले? आपल्या लाडक्या वडिलांच्या नावाला हसणाऱ्या या शिष्ट बाई कोण? हसण्यासारखे काय

कोठून येणार ? एखाद्या मोठ्या ढगामुळे निळ्याभोर आकाशावर धूसर पटल चढावे त्याप्रमाणे मोठ्या बाईंच्या आगमनाने त्या आनंदी वर्गावर उदासवाणे पटल चढले होते ! मघाशी चिवचिवणाऱ्या सगळ्या चिमण्या आता गप्प झाल्या होत्या. मघाशी वळवळणारे सगळे हात आता घडी करून बसले होते. भिरभिरणारे सगळे पाय आता जुडी करून बसले होते ! मोठ्या बाईंच्या रूक्ष आगमनानें फुलपाखरांचे सुरवंट बनावे, तशी त्या वर्गाची स्थिती झाली !

मध्येच एखाद्याचे ठसकणे, खाकरणे, दप्तर चाळवणे ऐकू येई. तेवढाच जिवंतपणाचा आभास–आणि तोही जरा मोठ्याने झाला की बाई ओरडत–

'खोका, खोका मेल्यांनो, बेंबीच्या देठापासून खोका. सुट्टीत चोरून शाळेच्या चिंचा खायला हव्यात. ' मधेच कुणाच्या पावलांची चाळवाचाळव झाली तरी बाई पुकारत– 'खबरदार कुणी जागेवरून हाललात तर–तंगडीच मोडून टाकीन एकेकीची! फार उंडारायला शिकलायत, बेशिस्तपणे वागायला शिकलायत. जगात वागायची काडीमात्र अक्कल नाही तुम्हाला !'...बाईंची तारसप्तकातील 'राग'दारीतील ध्वनिमुद्रिका चालू झाली. ओठ पिळले तर दूध निघेल असल्या त्या कोवळ्या पोरींना, आईच्या पंखांखालून नुकत्याच बाजूला झालेल्या त्या पाखरांना हा व्यवहाराचा दंडक का शिकवायचा ? आपण ज्या जगात वावरतो त्याची चिंता थोरांनी वहायची कां पोरांनी ? पण...

बाई बडबडतच होत्या ! जया ज्या कोपऱ्यात बसली होती. त्या भिंतीच्या खिडकीतून जोराने वारा आत येत होता व त्यामुळे भिंतीवरची दिनदर्शिका जोराने फडफडत होती–तिचा आवरून

सावरून धरलेला फ्रॉक हालत होता–टेबलावरच्या वहीची पानेही सळसळत होती. जयाला वाटले, या रागीट बाई या अवखळ वाऱ्यालासुद्धा वर्गात कोंडतील, या बंडखोर कॅलेंडरला टरकावून टाकतील, त्या बडबड्या वहीला पिशवीत कोंडतील...गप्प बसायचे कळत कसे नाही यांना...?

तेवढ्यात थोरल्या बाई गरजल्या–

'ए, कोपऱ्यात बसलेल्या निळा फ्रॉकवाल्या नवीन मुली, उभी राहा पाहू.'

मारा जयावर होता! जया नाइलाजाने उभी राहिली. वादळात गदगदणाऱ्या नाजुक वेलीगत ती गदगदत होती.

'तुझं नाव काय ?'

'जया'

'सबंध नाव सांग.'

'सबंध नाव ही...' आधीच बावरलेली जया थोडीशी आणखीन बावरली. सबंध म्हणजे वडिलांचे नाव व आपले नाव...तिला आईने सांगितलेले आठवले. मग ती घसा खाकरून म्हणाली,–

'माझं सबंध नाव जया अण्णा विष्णुपंत हे गोडबोले.'

जाणत्या पोरींनी हसण्याची उबळ अळेबळे दाबली. एवढा वेळ रागीट दिसणाऱ्या बाई मात्र थोड्याशा हसतमुखी झाल्या व कढ आलेल्या भाताप्रमाणे खदखदत विचारत्या झाल्या–

'जया–अण्णा–विष्णु–हे गोडबोले! असलं कसलं चमत्कारिक ग तुझं सबंध नाव ?'

आता मात्र जया चिडली. अगदी खरी चिडली! थोरल्या बाई असल्या म्हणून काय झाले? आपल्या लाडक्या वडिलांच्या नावाला हसणाऱ्या या शिष्ट बाई कोण? हसण्यासारखे काय

आहे त्या नावात ? वा रे वा ! आणि शेवटी एकेक अक्षरावर जोर देत ठासून ती म्हणाली—

'जया हे माझं नाव. माझ्या वडिलांना मी अण्णा म्हणते. शेजारच्या कमूअक्काचे वडील विष्णुपंत म्हणतात. आई 'हे' म्हणते आणि गोडबोले हे आमचं आडनाव. समजलं माझं सबंध नाव ?'

'समजलं, समजलं. बस खाली.' बाई उत्तरल्या आणि मग आपल्या रागीट चेहऱ्यानें वर्गाकडे रोखून म्हणाल्या, 'तुमच्या बाई रजेवर आहेत. तुम्ही अभ्यास करीत बसा. मी येतेच जरा वेळाने—फिरून, चक्कर मारून.'

बाई एकदाच्या वर्गाबाहेर पडल्या. त्या दूर गेल्या मात्र, वर्गात पुन्हा चिमण्यांची चिवचिव सुरू झाली. जयाच्या मनावरचे दडपणही आता थोडेसे कमी झाले होते.

तेवढ्यात शाळेच्या बागेतील गुलाबावर दोनचार रंगीत फुलपाखरे तिला बागडताना दिसली. शेजारच्या मुलीला कोपराने ढोसून जया म्हणाली,

'ए, त्या फुलपाखरांना पकडायला येतेस ?'

'वा ग वा ! आता तीन तासांनी पाणी प्यायची सुट्टी होईल. तोपर्यंत आपल्याला वर्गाबाहेर जाता येणार नाही.'

तीन तास याच वर्गात डांबून बसायचे ? अडकून बसायचे ? जयाला ही शिक्षा महाभयंकर वाटली. कारण भटकण्याचा तिला मनस्वी छंद होता. साधे जेवायला बसल्यावर देखील त्या तीस मिनिटांत बाहुलीला भात वाढण्यासाठी, पोस्टमनला दार उघडण्यासाठी, दुभत्याचे कपाट लावण्यासाठी, खिडकीची खिट्टी उघडण्यासाठी, झुरळाला घालविण्यासाठी, मोत्याला पिटण्यासाठी धावत

असे. मग आता तीन तास एकाच बाकड्यावर–वितभर जागेत बसावयाचे काम ही जबरदस्त सजा.

असे का म्हणून? असे काय म्हणून? याचा उलगडा होईना. तेवढ्यात पलीकडच्या अंगणातून हातात नकाशा घेऊन चाललेली कमूअक्का तिला दिसली. त्या अनोळखी वातावरणात ओळखीचा चेहरा दिसताच आनंदलेली जया जागेवर उभी राहिली व टाळ्या पिटून कमूअक्काला हाक मारणार तोच शेजारच्या त्या मघाच्याच मुलीने तिचा झगा ओढून तिला खाली बसविले व म्हटले,

'ए, आत्ता काय हाक मारतेस? अजून सुट्टी झाली नाही काही! थोरल्या बाई रागावतील ना!'

अरेरे! फिरून जयाचा विरस झाला. त्या खिन्न मनःस्थितीत तिची दोन मिनिटे गेली न गेली तोच शाळेच्या दारावरून कुठल्या तरी लग्नाचा बँड धूमधडाक्यात चालला होता, त्याचा आवाज जयाने ऐकला. ती मिरवणूक बघायला जाण्यासाठी तिचे बंडखोर पाय जागेवरून हालले देखील; पण तेवढ्यात ती मघाचीच मुलगी म्हणाली,

'उं हूं...वर्ग सोडायचा नसतो–नाही तर थोरल्या बाई...'

बाईंची छडीच वर्मी बसल्याप्रमाणे जया शरमिंदी होऊन खाली बसली. पण आज शाळेत आल्यापासून तिच्या बाल जिवाला ज्या वेदना झाल्या होत्या, तिच्या बाल देहाला ज्या यातना झाल्या होत्या, त्या उग्र स्वरूपात तिच्या चिमण्या मेंदूत थैमान घालू लागल्या, व इतका वेळ बळे बळे दडपलेली, हाडीमाशी खिळलेली बंडखोरी उफाळून वर येऊ लागली. असली कसली ही शाळा? म्हणे हलायचं नाही, कुणाला हाक मारायची नाही, फुलपाखरांच्या मागं धावायचं नाही, चिंचा पाडायला जायचं नाही, दारात उभं

राहायचं नाही, मिरवणूक बघायची नाही–शी ! असली कसली ही शाळा नि असल्या कसल्या या बाई ? जया आता मनात चांगलीच प्रक्षुब्ध झाली. 'आई, बाबा, मावशी, आजी–कुण्णी कुण्णी मला रागवत नाही–मग या चष्मेवाल्या मोठ्या बाईंनी काय म्हणून रागावायचं अन् काय म्हणून मारायचं ? आणि आई मारे म्हणाली की शाळेत जंमत असते! असली कसली जंमत? जयाचे चिमुकले ओठ कसल्या तरी निश्चयाने विलगले, डोळे कसल्याशा तेजाने लकाकले, हात दप्तर सावरू लागले, पाय ताडकन उभे राहिले; आणि त्या जागेवरच चिकटून बसलेल्या बाकीच्या वर्गाकडे पिंजऱ्यातल्या पाखराकडे रानातल्या पाखराने पाहावे त्या दिमाखाने, मिजाशीने, तुच्छतेने नजर टाकीत ते चिमुकले पाय जे पळाले, ते मोठ्या बाईंची नजर चुकवीत, भैय्याला पाठ दाखवीत, रस्त्यातल्या वाहनांशी लपंडाव खेळत थेट घरी येऊन थडकले. घर जवळ येताच तिने धारण केलेली सारी कठोरता वितळू लागली. तिने दारातच चपला भिरकावल्या. दप्तर फेकून दिले. पट्टी उडवून दिली आणि ती धावतच स्वयंपाकगृहात शिरली. काम आवरून आई केर काढीत होती.

आई दिसली मात्र ! शाळेतल्या त्या कठोर बाई, ते कशल वातावरण, ते ताठर तास–सारी सारी दूर दूर पळून फुलांचा मृदुल बगीचा समोर उमलावा, मृदुल गालिचा समोर उलगडावा तसे तिच्या हृदयाला वाटले. धावतच जाऊन तिने आईच्या कमरेला विळखा घातला.

' हे काय जयू ? एवढ्यात कशी परत आलीस शाळेतून ? आता पातळ बदलून मी शाळेतच येणार होते.'

' पातळ बदलण्यापेक्षा शाळाच बदल जा ! ' जया आईचे अंग घुसळीत म्हणाली. तिच्या पाठीवरून प्रेमळपणे हात फिरवीत आई म्हणाली.

' का ग जया ? '

' अं ऽऽ म्हणजे--आम्हाला नको जा ती शाळा--' पुढच्या गोष्टी सांगण्यापूर्वीच शाळेतला तो कसाबसा घालवलेला रटाळ तास, खटचाळ बाई, उग्र वातावरण तिला आठवले. तिचे चिमणे काळीज गलबलले, तिचे इवले डोळे पाणावले व मोठा हुंदका देत देत तिने आईच्या कुशीत तोंड लपविले.

★ ★ ★

## ३. राम–लक्ष्मण



आणि आज मात्र त्या दोघांचे भांडण झाले ! सर्वांनाच त्या गोष्टीचे आश्चर्य वाटत होते. नव्हे, त्या दोघांनासुद्धा त्या गोष्टीचे आश्चर्य वाटत होते ! आणि का नाही वाटणार ?

शिवराम व दत्ताराम हे त्या गावाला जिवाभावाचे मित्र म्हणून आज कित्येक वर्षे माहीत होते. होतेच त्या मित्रांचे तितके

हितगुज. दोघांची घरेसुद्धा एकमेकांच्या कुशीला बिलगली होती. एकाच्या परसदारचा प्राजक्त दुसऱ्याच्या परसात सडा पसरी, तर दुसऱ्याच्या अंगणातला आंबा पहिल्याच्या अंगणावर सावली धरी. शिवाचे 'राजा परधान्या' दत्ताच्या माळावर चरणीला जात तर दत्ताची पिके शिवाच्या विहिरीवर दाणे धरीत. शिवाच्या घरी गोड-धोड झाले, की दत्ताच्या घरी चूल पेटत नसे, तर दत्ताच्या घरी झगरे फुलले की शिवाला 'च्यापान्याची' ददात नसे. शिवाच्या कारभारणीने गौर मांडली, की दत्तारामाच्या भरलेल्या तसबिरींना पाय फुटायचे, तर दत्ताच्या घरधनिणीने कुळधर्म केला की शिवाची भांडीकुंडीसुद्धा पाव्हणी जात. फार काय–तांबडे फुटले की शिवाचा कोंबडा दत्ताच्या आवारात येऊन पुकारा करी, तर दत्ताचा विठूमिया दत्ताबरोबर 'शिवा ऊठ, शिवा ऊठ' चा पुकारा करी.

आणि आज मात्र त्या दोघांचे भांडण झाले ! भाबड्या गाव-कऱ्यांना वाटले, कुणा चांडाळाने दृष्टाळले का कुणा आगलावीने करणी केली, म्हसोबा जाणे ! एरवी येवढ्या क्षुल्लक कारणा-वरून मैत्रीला तडा जाण्याचे काहीच कारण नव्हते.

त्याचे असे झाले–

आज अंबाबाई तालीम आणि भवानी तालीम यांची चुरशीची कुस्ती होती. गावकऱ्यांनी नेमलेल्या पंचात शिवराम व दत्ताराम या मित्रांची जोडगोळी होती. फड संपला आणि काय असेल ते असो, एरवी प्रत्येक बाबतीत एकमत असलेल्या त्या मित्रांचे निकालाच्या बाबतीत दुमत झाले. एकमेकांवर जिवापाड माया करणारे असले तरी दोघेही दुराग्रही होते. तोंडातून शब्द गेला म्हणजे गेला. दत्ता स्वतःचा शब्द बदलायला तयार होईना. शिवाही स्वतःचा

शब्द बदलायला तयार होईना. काचेला काय किंवा मैत्रीला काय तडा गेला म्हणजे तिचे तुकडे व्हायला वेळ लागत नाही !

तसे बघितले तर दत्ता हा शिवापेक्षा दहाबारा वर्षांनी वडील होता. शिवाचा बाप वारल्यावर वडील–भावाच्या मायेने एकाकी कोवळ्या शिवाला त्याने हात दिला होता. आणि तो मायेचा हात या क्षणापर्यंत कधी अनुदार झाला नव्हता. तो मायाळू जीव आजपर्यंत कधी रागेजला नव्हता. एका परड्यात बांधलेल्या गुरांचीं शिंगे एखाद्या वेळी घासायचीच; शेजाराला राहिल्यावर क्वचित उणीअधिक बोलणी व्हायचीच–असा दत्ता विचार करी. ‘ शिवा बच्चा आहे. रग आहे जरा. परिस्थितीने मुसंडी मारली की येईल आपोआप ताळ्यावर’ अशी स्वतःचीच समजूत करी आणि मग कधीकाळी झालेली कुरकूर पाण्यातल्या मिठाच्या खड्याप्रमाणे पार विरघळून जाई. पण आज मात्र त्याचा तोल गेला. एखादी घटकाच मोठी अवक्षणी असते की काय कोण जाणे !

आणि शिवा–ते तर ऐन पंचविशीतले रक्त होते ! एकही अविचार न घडेल तर ते तारुण्य कसले, आणि एकही प्रमाद न घडेल तर ती पंचविशी कसली ! बऱ्याच वेळेला विचार करण्यापेक्षा अविचार करण्यातच तारुण्याला कृतार्थता वाटत असते ! बऱ्याच वेळेला शहाणे ठरण्यापेक्षा वेडे ठरण्यातच तारुण्याला सांगता वाटत असते ! हो–नाही तर वडिलांचे हरपलेले पांघरूण पुन्हा उभे करणाऱ्या दत्ताबरोबर शिवाने क्षुल्लक कारणावरून हमरीतुमरीवर यायचे कारण नव्हते.

दोघांनीही एकमेकांवर मनसोक्त तोंडसुख घेतले. शिवाने दत्ताच्या बेचाळीस कुळांचा उद्धार केला, तर दत्ताने शिवाला

बोलताना शिमग्यासाठी नवा कोश तयार केला. गावकरी स्तिमित होऊन ऐकत होते आणि ते दोघे एकमेकांवर हवे तसे तोंडसुख घेत होते. ' शिवा–गाढवा, अरे तुला ज्या हाताने दूधभात भरवला, तो हातसुद्धा अजून सुकला नाही या दत्ताचा. अरे, या सर्पाला दूध पाजण्यापेक्षा आंब्याखाली नेऊनशान ओतले असते तर त्यानेदेखील दोन कैऱ्या जास्त दिल्या असत्या ! ' दत्ता बड-बडत होता–' तुला बाप आठवून दिला नाही...'

' म्हणे बाप आठवून दिला नाही ! अरे, मेलेल्या कुत्रीची बेवारशी पोरेसुद्धा उकिरड्यावर जगतात, तर माझ्यासारखा माणसासारखा माणूस तुझ्याबिगर मसणात गेला असता असं वाटलं काय रं तुला ? तुझ्या मायेसाठी चौपदरी पसरून मी तुझ्या उंबरठ्यात काही धरणं धरून बसलो नव्हतो ! '

तरी दत्ताचे चालूच होते–' तुझा पोरगा सीक झाला–त्याला मोठा डागदर आणावा लागला–ममईला नेऊन त्येचं आपरेशण करावं लागलं-तवा तुझ्या गाठीचा पैका संपला, तवा म्या पदरचा शेताकडचा जमिनीचा तुकडा इकूनशान् तुझ्या छातीवरचा भार हलका केला...'

' मग काय–स्वतःची थोरवी मिरवण्यासाठी व लायकी वाढ-वण्यासाठी ती पडीक जमीन फुकून टाकलीस व चार पैसे माझ्या दातावर मारलेस म्हणू काय तुझ्यावर पवाडा रचू ? का तुझा फोटू काढू ? का मिरवणूक काढू ? का तुझ्या पायाचं पानी तीर्थ म्हून माज्या बायकापोरास्नी प्याया देऊ ? काय करू ? अरं, तू विषमानं बिमार झालास तवा मला न्याहारी गिळत नव्हती की झोप मिळत नव्हती. नि माझं हे मर्दाचं हाडसुद्धा निम्मं झालं जाग्रणं करताना नि तुझी घाण उपसतानी ! त्याचा इचार तुझ्या टकुऱ्याला कधी

शिवलाय का ? आणि तुझ्या कारभारणीनं माझ्या घरधनिणी-कडून वरचेवर बाळंतपणं करून घ्यायचा काय कागुद करून घेतलाय काय रं ?'

एक न् दोन. दोघेही तोंडाला येईल ते बडबडत होते. घसरणीला लागलेला दगड काय अन् मनुष्य काय कुठे जाऊन आदळेल याचा नेम थोडाच असतो ?

आणि अखेरीअखेरीस तर भांडण इतके विकोपाला गेले की एकमेकांवर हात टाकण्यापर्यंत मजल येऊन ठेपली. गावातले चार प्रतिष्ठित लोक मध्ये पडले नसते दर दोन शेजारणींपैकी एकीच्या मंगळसूत्राचे मणी विस्कटायला काही वेळ लागला नसता आणि मग–

शिवा एकटाच घरच्या मार्गाला लागला. घरे काही गोफणीच्या अंतरावर नव्हती. बरीच दूर होती. त्यामुळे येताना दत्ताच्या बैलगाडीतूनच दोघेही मैदानावर आले होते. विसावलेले बैल जुंपून दत्ता गाडीवर चढला. त्याने कासरा हातात घेतला व बैलांच्या पाठीवर हात मारून तो म्हणाला, 'चला रं,–काळ्या पांढऱ्या !' एरवी येवढा शब्द ऐकला की ती जोडी वाऱ्याशी भांडत दौड करायला निघे. पण आज मात्र ती जनावरे तसूभरही हालली नाहीत ! गाडीच्या डाव्या अंगाने पायीच चाललेला शिवा बघून त्या जनावरांना वाटले असावे–शिवा अजून गाडीत चढायचा आहे. त्याच्याशिवाय कसा पाय उचलायचा ? धनी काय म्हणेल ? पण त्यांचा धनीच त्यांच्यावर कडाडला, 'रेंगाळता काय ल्येकांनो माथ्यावर पाऊस भरून आलाय. शेतातून सांजावायला लागलाय. रात पडायच्या आत घर गाठाया हवं.' – आणि त्याने हातातला आसूड जोशात त्यांच्या पाठाणीवर ओढला. बैल उमगले की आज

हवेबरोबर मालकही बदललाय. एरवी चौदाव्या रत्नाचा प्रयोग झालेला नाही. आणि मग घुंगराशी गप्पा मारीत मारीत ती जोडी भरधाव निघाली.

गाडी चालू झाली व वाऱ्याचा वेग वाढला. पावसाचे टपोरे थेंब वेगाने खाली आदळायला लागले. रानवट वारा उन्मत्तपणे घोंगावायला लागला. विजेचे थैमान सुरू झाले. क्षितिजावर पंखाला पंख घसटून एक पाखरांचे भिरे घरट्याकडे माघारत होते. त्यातल्या सग्यासोयऱ्यांची वादळी तांडवात ताटातूट होऊन त्यांतली चार–दोन पाखरे त्या मावळतीच्या अंधारात आर्तपणे चित्कारत गेली. एवढा वेळ एकमेकांच्या आलिंगनात विसावलेले दोन आम्रवृक्ष कडकडलेल्या विजेच्या मागोमागच धडाडकन् जमिनीवर कोसळले...वर्षानुवर्षे त्यांच्यावर वस्तीला राहिलेल्या कोकिळांची व चिमण्यांची घरटी आतल्या कच्च्याबच्च्यांसकट चिरडली गेली पण मनातल्या वादळापुढे या बाहेरच्या वादळाची दत्ताला दादच नव्हती जणू काही !

दत्ता मघाशी एवढा भांडला खरा, पण त्याला सुद्धा चुकचुकल्यागत वाटत होते. आठवड्याचा बाजार असो, गावचा उरूस असो, अगर कामेश्वराची जत्रा असो· शिवाला घेतल्याशिवाय त्याची गाडी हालली नव्हती. त्यामुळे आज त्याला अगदी एकटे एकटे वाटत होते. मध्येच त्याला वाटे, आपले चुकले तर नाही ? आपला मूर्खपणा तर झाला नाही? पण फिरून त्याच्या अहंकाराने उचल खाल्ली–नाही! माझे नाही–

शिवाचेच चुकले ! मी केलेले उपकार त्याने असे कचऱ्याच्या मोलाने मोजायला नको होते ! आणि त्याने केलेले उपकारही तमाशातल्या नाच्या पोरीसारखे उघडे–वाघडे करून दाखवायला

नको होते ! पैशाचे देणे-घेणे वसूल करायचे असते; पण मायेच्या माणसातले उपकाराचे देणे-घेणे वसूल तर नव्हेच पण नुसते बोलून-सुद्धा दाखवायचे नसते ! कारण मायेचे ऋण फेडण्यापेक्षा न फेडण्यात, मायेचा भार उतरविण्यापेक्षा वाढवण्यात जीवनातील निम्माशिम्मा आनंद साठवलेला असतो. पण या गावंढळ शिवाला हे कुठले उमजायला ! बरे झाले भांडण झाले ते ! किती माण-साळले तरी वाघरू जातीवर जायचे आणि अन्नदात्याच्या नरडीचा घोट घ्यायचे, हेच खरे !

–तेवढ्यात बैल एकदम थांबले. तो घराला विसरला तरी बैल घराला विसरले नव्हते. माणसापेक्षा जनावरेच बरी. कारण माणसे इमानाला काडी लावतील, पण जनावरे काडीच्या इमा-नालासुद्धा जागतील.

दत्ता भानावर आला. घर आले होते तर ! तेवढ्यात ओळखीचा घुंगरांचा आवाज ऐकून दत्ताची पोरे धावत धावत बाहेर आली व बाबाला बिलगून म्हणाली–

‘ हे काय बाबा, काका नाही आला ? ’

दत्ताची कारभारीण लगबगीने येऊन म्हणाली, ‘ हे काय ? भावोजी कुठे गेले ? पावसापान्याचं म्हून वस्तीला राहिलं काय गावात ? ’

इतक्यात शिवाची मोठी पोरगी भामी गाडीकडे येत येत म्हणाली, ‘ काका–आईनं आज हुलग्याचं बेसन केलंय-तवा दादासंगं तुलाबी ज्येवायला बोलावलंय ’ आणि त्याच वेळी उडचा मारीत धावला तो शिवाचा धाकटा रखम्या. रखम्याने कांबळ्याचा एक तुकडा दत्तापुढे केला व तो म्हणाला, ‘ काका–तुझी डोई बघ

मायंदाळ भिजलीय. याला पूस की ती.'–दत्ताने वात्सल्याने त्याचा एक गालगुच्चा घेतला.

इतक्यात नदीपल्याडची रेवू कोळीण ताज्या शहाळ्यांची पाटी घेऊन आली. ती म्हणाली, 'दत्तारामदादा, तुमास्नी गोडच्या पाण्याची म्हून मुद्दाम पाटी घेऊन आलेया.'

दत्ता बायकोला हाक मारून म्हणाला, 'अग ए, ही पाटी खाली करून रेवूचे पैसे देऊन टाक ग.'

'छे ! छे ! हिशेब कालच मोकळा केलाय शिवबांनी. तुमास्नी लई आवडते म्हून कालच त्येंनी सबंध पाटीचाच लिलाव घेतलाया. नदीला वढ व्हती म्हून सकाळपून घावलं नाही यायला. बरं, रामराम दादा !' म्हणून रेवू परतली. दत्ता विस्मित होऊन बघतच राहिला खुळ्यासारखा !

त्याच वेळी मागच्या परड्यातली शिवाची पंढरी नि काशी हंबरायला लागल्या. कारण दत्ताची गाडी आली की आपला धनी यायचाच हे त्या मुक्या जनावरांनासुद्धा माहीत झाले होते. आणि त्या गडबडीतच दत्ताचा 'विठूमिया' तारस्वरात ओरडायला लागला.

'दत्ता ये–शिवा ये–दत्ता ये–शिवा–ये.' त्या मित्राचे अद्वैत त्या अजाण पाखरालासुद्धा उमगले होते तर !

दत्ताने सुन्नपणे समोर बघितले, तो शिवाचा आंबा पावसाने झोडपला जाऊनही दत्ताच्या अंगणात सडा घालीत होता ! !

–या सर्व गोष्टी दत्ताने उघड्या डोळ्यांनी बघितल्या. त्या सर्व गोष्टी दत्ताने उघड्या कानांनी ऐकल्या. आणि शरमेने– कमालीच्या शरमेने त्याचा चेहरा काळा ठिक्कर पडला.

आमच्या बायकांना, पोरांना, गड्यांना, शेजाऱ्यांना, जनावरांना— फार काय पाखरांना व झाडाझुडपांनासुद्धा आमच्यातील प्रेम माहीत आहे—मग आमचे भांडण होऊच कसे शकेल ? चूक कुणाचीही असो, आमच्यातले वैर राहूच कसे शकेल ? पिकाचं आणि पाण्याचं भांडण कधी कुणी ऐकलंय का ? अंथरुणाचं व पांघरुणाचं वैर कुणी बघितलंय का ? छे ! छे ! अशक्य आहे ही गोष्ट ! शिवराम—दत्तारामाची तुटी होऊ शकत नाही ! दत्ताराम—शिवरामाची फुटी होऊ शकत नाही !

मग—मग—

त्याने बैलांचा कासरा हातात घेतला व गाडी परत रस्त्याला लावून तो म्हणाला. 'अगं ए. शिवा जरा मागं राह्यलाय. त्यास्नी घेऊन येतो.'

'बिगी बिगी जावा. मधल्या वढ्याला पानी आलं तर भावोजी अडकून पडतील.' त्याची सहधर्मचारिणी उत्तरली.

गाडीला कंदील लावता लावता तो बायकोला म्हणाला, 'अन् हे पग, शिवाच्या परसातल्या कडब्यावर झाकन न्हाईये. पाऊस अमाप भरलाय. तवा आपल्या पडवीतली ताडपत्री त्येच्यावर घाल, वरं का ?'

आणि त्याने जोरात गाडी मारली.

आधीच अंधारलेल्या त्या वावराच्या काळीत रात्रीच्या सावळ्या पावलांनी आणखीनच काजळून आले होते. पावसाची सर एखाद्या वेड्याच्या बडबडीप्रमाणे वेडेवाकडे पुटपुटत होती. मध्येच लख्कन वीज लखलखे आणि पूर्वीच्या अंधारात जणू भर पडलीसे वाटे. रातकिडे व रानकिडे यांची कर्कश गीते त्या वादळी वातावरणाला साथ देत होती ! फांद्यांतून भेदरलेली पाखरे आपल्या छबड्यांना उराशी बिलगून बसली होती. चुकलीमाकली

गुरे आपल्या चिमखड्यांना अचळाशी धरून लावून धीर देत होती. चिमुकले गवताचे तुणीर त्या वावटळीशी झगडताना एकमेकांच्या हातांत हात घालीत होते, तर मोठाले वृक्ष त्या वादळाशी झगडताना खांद्याला खांदा भिडवीत होते. सृष्टीच्या त्या रौद्र आणि सौम्य, कराल आणि कोमल रूपाकडे पाहून दत्ताला वाटले– कितीही अंधारले-कितीही वादळले, तरी पाखरे पाखरांना, गुरे गुरांना, झाडे झाडांना विसंबत नाहीत--दुरावत नाहीत.–

मग मी तर माणसासारखा माणूस ! छे ! छे ! माझे हे वागणे पाहून या जनावरांनासुद्धा किळस आली असेल, या पाखरांनासुद्धा उबग आला असेल, या शिवारांनासुद्धा संताप आला असेल! होऽ माणसासारखा माणूस मी–पण पशूतली माणुसकी कधीमधी जागी होत असेल, पण माणसातील पशुत्व वेळोवेळी जागे होत असते! त्याशिवाय का वारेवादळात मी शिवाला अंतराय दिला? ...

तेवढ्यात वीज चकाकली. आणि त्या क्षणैक प्रकाशात समोरून चालणारा–हो, शिवबाच होता तो. पावसाने न्हालेले ते शरीर. माथ्यावरून ओघळणाऱ्या त्या जलधारा. पावसाचा मारा चुकविण्यासाठी डोक्याला लपेटलेला तो केशरी फेटा. एकलेपणाच्या जाणिवेने धडधडणारे छाताड. वादळी वाऱ्याने थडथडणारे ते हात. नुकत्याच झालेल्या अनपेक्षित भांडणामुळे भांबावलेली ती नजर–शंकाच नव्हती ! तो शिवबाच होता हे झोपेतल्या दत्तानेसुद्धा सांगितले असते.

दत्तारामने एका झटक्यासरशी गाडी थांबवली आणि एखाद्या लहान पोराच्या आतुरतेने व चपळाईने गाडीखाली उडी घेतली.

शिवराम आपल्या नादातच होता ! समोरची गाडी दत्ता-

रामाची आहे ही संवेदना त्या भरल्या अंधारामुळे किंवा भारल्या विचारांमुळे म्हणा त्याला होऊच शकली नाही. त्याने आपल्याच नादात पाऊल पुढे टाकले. तेवढ्यात आपला हात दत्ताने हलकेच त्याच्या खांद्यावर ठेवला. अंगावर जिवाणू पडावे तसा दचकून शिवा ओरडला. ' कोऽन..कोन हाय ?'

' भिऊ नगं शिवबा. दुसरं–तिसरं कोनी न्हाई, तुझाच--तुझाच दत्ता ! बघ तरी !'

' माझा दत्ता ? हं ! माझा दत्ता–मघा फड झाला तवाच गारद झाला.'

' अंहं ! मघा शुद नव्हती त्यास्नी. आता या पावसानं माथं पार थंड झालंया, नि सारं काही ताळ्यावर आलंया.'

तरीही शिवा न बोलता पुढे चालू लागला. दत्ताने त्याचा सदरा ओढला, त्याचा हात पकडला व तो काकुळतीने म्हणाला. ' असं काय करतुयास, शिवा ? मघा कुस्तीनं झपाटलेलं उतरलं न्हाई का अजून ? माझ्यासंगं घरी नाही यायचं ?'

' तुझ्याबरोबर ? तू माझा कोण ? मी तुझा कोण ? या उलट्या काळजाच्या शिवानं तुझ्यामाझ्या मैत्रीची भर चवाठ्यावर खांडोळी केली! –तुझ्यामाझ्या आतड्याला भर चौकात विस्तव लावला! तुझ्या आईच्या मायेला या खाटकाच्या काळजानं सुरा लावला– तुझ्या आईच्या पान्ह्याला या दगडाच्या तान्ह्यानं लवंडलं ! – आता कुठल्या तोंडानं तुझ्यासंगं बोलू ? आता कुठल्या हातानं तुझा हात कवळू? आता कुठल्या पावलानं तुझ्यासंगं चालू ?' गदगदलेल्या स्वरात शिवा पुटपुटला.


दत्ताने त्याला गाडीजवळ नेले. त्याचा हात धरून त्याला ओढता

ओढता दत्ता म्हणाला. 'असं कधी झालंय शिवा? अरं, लक्ष्मणा-बिगरं राम कधी राहिलाय का?'

—आणि त्याच क्षणाला त्या राम-लक्ष्मणांच्या जोडीवर आकाशातून फुलांची पखरण उधळली, विजेच्या मशाली पाजळल्या, आणि रातकिड्यांची मंगल गीते जोरात सुरू झाली.

★ ★ ★

## ४. चणे खावे लोखंडाचे



आजोबा वयाने मोठे आहेत. तसेच मनानेही मोठे आहेत. त्यांचा नुकताच अमृत महोत्सव झाला आहे तर त्यांच्या कारखान्याचा रौप्यमहोत्सव झाला आहे. उभ्या महाराष्ट्रात ख्यातनाम असलेचा 'सुरुची' बिस्किट कारखाना माझ्या आजोबांचाच.

डोळे मिटूनही मुले आमच्या बिस्किटांची चव तर ओळखतातच पण डोळे उघडे ठेवून रात्री आयांना छळणारी मुले 'सुरुची' बिस्किट नुसते हातात दिले तरी चट झोपी जातात. वाढदिवस–समारंभ, स्वागत–समारंभ, निरोप–समारंभ आणि ठिकठिकाणचे अल्पोपहार 'सुरुची'शिवाय पार पडत नाहीत.

आजोबांनी मुळी जाहिरातच केली आहे. कोठल्याही सार्वजनिक समारंभात दोन गोष्टी महत्त्वाच्या असतात. पहिला अध्यक्ष आणि दुसरा 'सुरुची'चा पुडा.

आजकाल तर धंद्यात बरकत आल्यापासून–कारखाना मोठ्ठा झाल्यापासून–खुद्द आजोबांनाच ठिकठिकाणी अध्यक्ष म्हणून पाचारण्यात येते. आजोबा मुलामुलींच्या संस्थांत गेले तर 'सुरुची' बिस्किटांचाच खाऊ म्हणून पाऊस पाडून येतात.

आजोबांचा व्याप वाढला तसा त्यांनी गाड्या घेण्याचा सपाटा चालवला. मालाच्या ने-आणीसाठी ट्रक, फिरत्या जाहिरातदारांसाठी स्टेशन--वॅगन, तर घरासाठी ॲम्बॅसिडर. पण मजा अशी की यांतल्या कुठल्याही गाडीत संध्याकाळी बसायचे म्हणजे त्यांना सजा वाटते.

रोज संध्याकाळी पदयात्रा केल्याविना त्यांची दिवसाची यात्रा पुरीच होत नाही. आजोबांच्या या पदयात्रेचे एक वैशिष्टय मी हेरून ठेवलं आहे. उन्हाळा असो–पावसाळा असो–हिवाळा असो; संभाजी पुलाच्या कोपऱ्यापर्यंत ते जाणारच. तिथल्या कुठल्या असेल त्या चणेवाल्याकडून थोडे तरी चणे घेणारच. आणि मग ते अगदी हलकेहलके खात त्या पुलावर पाच–दहा मिनिटे काढणारच.

आणि गंमत अशी की त्या दहा मिनिटांत पावसाची सर आली तरी आजोबा छत्री उघडणार नाहीत. कडकडून रून पडले तरी हॅट चढवणार नाहीत. थंडीने काकडले तरी स्वेटर चढवणार नाहीत. जसे ते क्षण त्यांचे स्वतःचे नसतात. त्यांच्या हातातल्या त्या चण्यांचेच असतात !

एकदा संध्याकाळी ते कारखान्याच्या दक्षिण हिंदुस्थानच्या दौऱ्यावरून आले. गाडी लेट आलेली–जेवणे खोळंबलेली–त्यांची स्वतःची खूप दमणूक झालेली–तरी पण पठ्ठे चहा प्यायल्या प्यायल्या बाहेर पडले. पुलावरून चणे घेऊन आले आणि मगच जेवले.

दुसऱ्या दिवशी मी मुद्दामच त्यांच्या सायंकालीन पदयात्रेत सामील झालो. चणेवाल्याजवळून चणे घेऊन उभ्या असलेल्या आजोबांना म्हणालो–'आजोबा, तुम्हाला वेळ असला तर आपण कट्ट्यावर बसू या.'

'जरूर बिंदुसार–'

'आजोबा–मला तुम्हाला काही विचारायचंय.'

'मग मोकळेपणी विचार. तू काही सिंहासमोर सोडलेला ससा नाहीस.'

'तसं नाही आजोबा, पण लहान तोंडी मोठा घास–'

'आता तुम्ही मॅट्रिकला–एस् एस्. सी. ला आलात. आमच्या नि तुमच्या जोड्यांचे माप हळूहळू एक व्हायचे. आता आजोबा-नातू हे नाते विरघळायचे. मित्राचे–मोठा नि छोटा मित्र–असे नवे नाते व्हायचे.'

'होय ना–मग या नव्या नात्याने सांगा की मला कळायला लागल्यापासून गेली दहा वर्षे तुमचा चण्याचा नेम चुकत नाही. जेवण नाकाराल पण इथली प्रदक्षिणा चुकणार नाही. असं चणा–

प्रकरण आहे तरी काय ? कधी पायाचे तुकडे पडले. कारखान्यात दमला तरीही तंगडतोड करत इथपर्यंत येता. का ? असं का ?'

आजोबा मिशीतल्या मिशीत हसून म्हणाले, 'या गोष्टीकडे तुझं इतकं लक्ष असेल अशी मला कल्पना नव्हती.'

'मी आता एस्. एस्. सी. ला नाही वाटतं आलो ? मग गेली पाच वर्षं तुमचा हा चणा उपक्रम लक्षात आल्यावर आम्हाला याच्या मुळाशी काही रहस्य आहे असं वाटू नये वाटतं ?'

'हे बघ बिंदुसार, या चण्यांच्या मुळाशी रहस्य नसलं तरी कथा निश्चितच आहे.'

'कथा ? वा–वा, मग सांगा, आत्ता सांगा–'

'चल, हे चणे खातच सांगतो.'

आम्ही पुलाच्या कठड्यावर बसलो. खालून नदी वाहत होती. वरून आजोबांच्या कथेची नदीही वाहू लागली–

'बिंदुसार, एकेकाळी मीही तुझ्याएवढा लहान होतो. पण–तुझ्यासारखा भाग्यवान मात्र नव्हतो. तुला आई,–बाबा आहेत, आजी-आजोबा आहेत. मला मात्र एका आईशिवाय कुण्णी नव्हतं. माझे बाबा माझ्या वयाच्या आठव्या वर्षीच त्यावेळी उपटलेल्या प्राणघातकी इन्फ्लुएंझाच्या साथीला बळी पडले होते.

'आईनेच मला वाढवले. आपल्या बंगल्यातले वृक्ष ढगांच्या पाण्यावर वाढतात. हा देवेंद्र आईच्या डोळ्यांतल्या पाण्यावर वाढला. असे वर्षं गेले.

'पण वर्षश्राद्ध झाले त्या सकाळी आई मला म्हणाली– ' देवेंद्रा, माझ्या डोळ्यांतल्या पाण्यावर वाढशील तर नुसता एरंड होशील, वर्षभराच्या अनुभवावरून सांगते, कमनशिब्याच्या मदतीला कुणी

'मी शाळेत एकपाठी असल्याने या चार ओळी चार मिनिटांत जिभेवर बसवल्या. मी ऐटीत म्हणतो आहे अशी खात्री झाल्यावर तिने स्वतःच मला पुलावरच्या एका मोक्याच्या जागी उभे केले आणि आपण पुलाखालच्या शंकराच्या देवळात माझी वाट पहात, माझ्यासाठी देवाची प्रार्थना करीत बसून राहिली.

'बिंदुसार, आज शास्त्र पुढे गेले आहे. ध्वनिमुद्रिकांनी अनेकांचे आवाज धरून ठेवले आहेत. घरात डझनावारी टेपरेकॉर्डर्स आहेत पण आज आई नाही! नाहीतर तिचा तो पहिला कानमंत्र वेदमंत्र म्हणून ध्वनिमुद्रित करून घेतला असता. कारखाना उघडताना सर्व कामगारांच्या कानावरून रोज घालवला असता!

'बिंदुसारा, हरभऱ्यात दुसरी जीवनसत्त्वे असतातच पण या आईच्या हरभऱ्यात माझ्या निःसत्त्व जीवनाला पुनरुज्जीवित करण्याचे सामर्थ्य होते. 'विका आणि शिका–' या तत्त्वाचा उद्‌घोष करीतच मी एस्. एस्. सी. झालो.

'त्यावेळी देश पारतंत्र्यात होता. साहेबाची हांजी हांजी करून कांजी पिण्याचे ते दिवस होते. साहेबाचे पाय धरून आपले पाय नोकरीत स्थिर करण्याचे ते दिवस होते. पण आईच्या त्या चण्यांनी मला दिव्य दृष्टी दिली. स्वतःच्या घरकुलात स्वतःच्या हातातला धंदा सुरू करून स्वतःच्या पायावर उभे रहायचे मी ठरवले.

'त्यावेळी शेजारच्या घरी लोकमान्य टिळकांचा केसरी यायचा त्यावर मी तुटून पडायचा. त्यातला शब्द न् शब्द खाऊन टाकायचा. मस्तकात गेला की त्याचा लाव्हारस बनायचा; नसानसांतून रक्त होऊन वाहू लागायचा. ज्याचा भक्त–त्याचं रक्त...

'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे.' हे लोकमान्यांचं

धावून येत नसतं. म्हणूनच ज्याला स्वतःचे पाय असतात त्याने दुःखाने हाय खाऊन चालत नसते.'

मी गडबडून म्हणालो–

'मग काय करायचं आपण ?

'माझं ऐकशील ? मी सांगेन त्याप्रमाणे वागशील ?'

मी तिचा हात हातात घेत म्हणालो–

'मुंजीत गुरुजी म्हणाले–मातृ देवो भव प्रथम म्हणायचे म्हणजे आई, तूच माझा पहिला गुरू–'

'होय ना ? मग या गुरूचं ऐक. मी स्वस्तात स्वस्तचा एक उद्योग करणार आहे. हरभरे आणणार आहे. ते भाजणार आहे. त्याचे तिखटा-मिठाचे फुटाणे करणार आहे. बाजारात नुसते गोड नि खारे फुटाणे मिळतात. उद्या अनायसे श्रावण शुक्रवार आहे. लोक हे फुटाणे नक्की घेतील.'

'घरी येऊन ?' मी असमंजसपणे म्हटले.

'वस्तू लोकप्रिय होईस्तो आपण लोकांच्या दारी जायचे असते, मग लोक आपल्या घरी येतात.'

'संध्याकाळी रिठा लावलावून धुतलेली माझी एकुलती एक धडकी सदरा–चड्डी मी चढवली. आईनेच बाबांचे कपडे लहान करून माझ्या अंगाचे बनवले होते. माझ्या हातात फुटाण्याच्या पंचवीस पुड्या देऊन मला देवाला आणि बाबांच्या फोटोला नमस्कार करायला लावून आईने वाटेला लावले.

'घराच्या उंबऱ्याशी तिने बजावले 'असं रोज हापिसं सुटायच्या वेळी पुलावर उभं रहायचं. तोंड हसतमुख ठेवायचं. तरतरीत आणि गोड स्वरानं ओरडायचं 'चणे घ्या मस्त, लावलेत स्वस्त! आमचा उपहार, तुमचा श्रमपरिहार !'

'मी शाळेत एकपाठी असल्याने या चार ओळी चार मिनिटांत जिभेवर बसवल्या. मी ऐटीत म्हणतो आहे अशी खात्री झाल्यावर तिने स्वतःच मला पुलावरच्या एका मोक्याच्या जागी उभे केले आणि आपण पुलाखालच्या शंकराच्या देवळात माझी वाट पहात, माझ्यासाठी देवाची प्रार्थना करीत बसून राहिली.

'बिंदुसार, आज शास्त्र पुढे गेले आहे. ध्वनिमुद्रिकांनी अनेकांचे आवाज धरून ठेवले आहेत. घरात डझनावारी टेपरेकॉर्डर्स आहेत पण आज आई नाही! नाहीतर तिचा तो पहिला कानमंत्र वेदमंत्र म्हणून ध्वनिमुद्रित करून घेतला असता. कारखाना उघडताना सर्व कामगारांच्या कानावरून रोज घालवला असता!

'बिंदुसारा, हरभऱ्यात दुसरी जीवनसत्त्वे असतातच पण या आईच्या हरभऱ्यात माझ्या निःसत्त्व जीवनाला पुनरुज्जीवित करण्याचे सामर्थ्य होते. 'विका आणि शिका–' या तत्त्वाचा उद्घोष करीतच मी एस्. एस्. सी. झालो.

'त्यावेळी देश पारतंत्र्यात होता. साहेबाची हांजी हांजी करून कांजी पिण्याचे ते दिवस होते. साहेबाचे पाय धरून आपले पाय नोकरीत स्थिर करण्याचे ते दिवस होते. पण आईच्या त्या चण्यांनी मला दिव्य दृष्टी दिली. स्वतःच्या घरकुलात स्वतःच्या हातातला धंदा सुरू करून स्वतःच्या पायावर उभे रहायचे मी ठरवले.

'त्यावेळी शेजारच्या घरी लोकमान्य टिळकांचा केसरी यायचा त्यावर मी तुटून पडायचा. त्यातला शब्द न् शब्द खाऊन टाकायचा. मस्तकात गेला की त्याचा लाव्हारस बनायचा; नसानसांतून रक्त होऊन वाहू लागायचा. ज्याचा भक्त–त्याचं रक्त...

'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे.' हे लोकमान्यांचं

वाक्यही मी रामरक्षेबरोबर जपले त्यातूनच स्वतंत्र व्यवसायाची कल्पना मनात उद्‌भवली.

'आई माझी नुसती जन्मदात्रीच नव्हती तर स्फूर्तिदात्रीही होती. स्वराज्याची लाट तिच्यापर्यंतही पोचली तिने मग वेगळीच टूम काढली. घरी मैदा करून त्यात सोडा, साखर, मीठ, बेकिंग पावडर वगैरे घालून देवाच्या तबकडीचे साचे करून, खालीवर तव्यावर विस्तव ठेवून, घरगुती भट्टी करून तिने पहिले बिस्किट केले.

ते गुबगुबीत, गुलाबी बिस्किट पाहून मला चंद्राचा तुकडा हाती येण्याइतका ब्रह्मानंद झाला. त्यावेळी सोवळेओवळे कडक असायचे. बाजारी बिस्किटाचे वावडे असायचे. त्यात विदेशी साखरेवर बहिष्कार पडायचे. त्यामुळेच लोकांनी आमच्या सोज्वळ बिस्किटांचे उत्स्फूर्त स्वागत केले. आईने पुडे बांधायचे आणि मी घरोघरी जाऊन खपवायचे. अनेक प्रयोग आणि अनेक स्थित्यंतरे होत होत आजचे 'सुरुची' बिस्किट जन्माला आले.

लोण्याहून मार्दव असलेले आणि भारतात मान्यता पावलेले 'ममता' बिस्किट तर मी माझ्या मातेच्या स्मरणार्थच केले आहे. कारण मातेच्या ममतेतूनच मला बिस्किटांची गुरुकिल्ली सापडली आहे.'

न बघितलेल्या पणजीची तेजस्वी प्रतिमा नजरेपुढे रेखाटीत मी विचारले, 'आजोबा, तुमच्या आईने कारखान्यातले पहिले बिस्किट बघितले का ?'

'नुसते बघितले नाही तर खाल्लेसुद्धा. तिचा बारा महिन्यांचा मंगळवारचा उपवासाचा नेम मोडून खाल्ले.'

'काय, सांगताय काय ?'

'होय, आणि नुसते खाल्ले नाही तर त्यावेळी मला बजावले.'

'काय–काय–बजावले?'

'बजावले की, आज तुझ्या बिस्किटावर मी माझा मंगळवार सोडते आहे. याची आठवण ठेवून तू ते इतके पूर्णत्वास ने की माझ्याप्रमाणेच इतरांनाही तुझे बिस्किट खाल्ल्यावर दुसरे काही खाण्याचा मोह झाला न पाहिजे– नव्हे, दुसरं काही खाण्याची इच्छाच राहिली नाही पाहिजे.'

'देवेंद्र, ज्या वेळी तुझी बिस्किटे मोठी होतील त्यावेळी तूही मोठा होशील. कीर्ती आणि संपत्ती तुझ्या पायाशी येतील. पण त्यावेळी नम्रतेचं दास्यत्व मात्र तू सोडू नकोस. डोळ्यांवर धूर येऊ देऊ नकोस. यशाचा डोंगरमाथा दिसला तरी कष्टांचा पायथा विसरू नकोस.'

बिंदुसार, पुढे पंधरवड्यानेच आई गेली. पण आई गेली तरी तिने शिकवलेली गाथा मनात कोरलेली राहिली. तिने सांगितलेली गीता हातापायांत संजीवनी भरत गेली. तिने दिलेली संथा बुद्धीला गायत्रीमंत्र होऊन बसली!'

'आजोबा, अशी आई मिळणारा माणूस खरा भाग्यवान असतो नाही?'

'अशी पणजी मिळणाराही काही कमी भाग्यवान नसतो!' आजोबा हसले आणि पुढे म्हणाले–'अरे, आपल्या घराण्यातली ती कुंतिमाताच होती–जिजामाताच होती–साक्षात स्फूर्तिदेवताच होती.'

'बिंदुसार पहिल्या दिवशी फुटाण्याची पुडी घेऊन मी पुलावर जायला निघालो तेव्हा मी उंबऱ्यात किंचित अडखळलो होतो.

वाक्यही मी रामरक्षेबरोबर जपले त्यातूनच स्वतंत्र व्यवसायाची कल्पना मनात उद्भवली.

'आई माझी नुसती जन्मदात्रीच नव्हती तर स्फूर्तिदात्रीही होती. स्वराज्याची लाट तिच्यापर्यंतही पोचली तिने मग वेगळीच टूम काढली. घरी मैदा करून त्यात सोडा, साखर, मीठ, बेकिंग पावडर वगैरे घालून देवाच्या तबकडीचे साचे करून, खालीवर तव्यावर विस्तव ठेवून, घरगुती भट्टी करून तिने पहिले बिस्किट केले.

ते गुबगुबीत, गुलाबी बिस्किट पाहून मला चंद्राचा तुकडा हाती येण्याइतका ब्रह्मानंद झाला. त्यावेळी सोवळेओवळे कडक असायचे. बाजारी बिस्किटाचे वावडे असायचे. त्यात विदेशी साखरेवर बहिष्कार पडायचे. त्यामुळेच लोकांनी आमच्या सोज्वळ बिस्किटांचे उत्स्फूर्त स्वागत केले. आईने पुडे बांधायचे आणि मी घरोघरी जाऊन खपवायचे. अनेक प्रयोग आणि अनेक स्थित्यंतरे होत होत आजचे ' सुरुची ' बिस्किट जन्माला आले.

लोण्याहून मार्दव असलेले आणि भारतात मान्यता पावलेले ' ममता ' बिस्किट तर मी माझ्या मातेच्या स्मरणार्थच केले आहे. कारण मातेच्या ममतेतूनच मला बिस्किटांची गुरुकिल्ली सापडली आहे.'

न बघितलेल्या पणजीची तेजस्वी प्रतिमा नजरेपुढे रेखाटीत मी विचारले, 'आजोबा, तुमच्या आईने कारखान्यातले पहिले बिस्किट बघितले का ?'

' नुसते बघितले नाही तर खाल्लेसुद्धा. तिचा बारा महिन्यांचा मंगळवारचा उपवासाचा नेम मोडून खाल्ले.'

' काय, सांगताय काय ?'

'होय, आणि नुसते खाल्ले नाही तर त्यावेळी मला बजावले.'

'काय–काय–बजावले ?'

'बजावले की, आज तुझ्या बिस्किटावर मी माझा मंगळवार सोडते आहे. याची आठवण ठेवून तू ते इतके पूर्णत्वास ने की माझ्याप्रमाणेच इतरांनाही तुझे बिस्किट खाल्ल्यावर दुसरे काही खाण्याचा मोह झाला न पाहिजे– नव्हे, दुसरं काही खाण्याची इच्छाच राहिली नाही पाहिजे.'

'देवेंद्र, ज्या वेळी तुझी बिस्किटे मोठी होतील त्यावेळी तूही मोठा होशील. कीर्ती आणि संपत्ती तुझ्या पायाशी येतील. पण त्यावेळी नम्रतेचं दास्यत्व मात्र तू सोडू नकोस. डोळ्यांवर धूर येऊ देऊ नकोस. यशाचा डोंगरमाथा दिसला तरी कष्टांचा पायथा विसरू नकोस.'

बिंदुसार, पुढे पंधरवड्यानेच आई गेली. पण आई गेली तरी तिने शिकवलेली गाथा मनात कोरलेली राहिली. तिने सांगितलेली गीता हातापायांत संजीवनी भरत गेली. तिने दिलेली संथा बुद्धीला गायत्रीमंत्र होऊन बसली !'

'आजोबा, अशी आई मिळणारा माणूस खरा भाग्यवान असतो नाही ?'

'अशी पणजी मिळणाराही काही कमी भाग्यवान नसतो !' आजोबा हसले आणि पुढे म्हणाले–'अरे, आपल्या घराण्यातली ती कुंतिमाताच होती–जिजामाताच होती–साक्षात स्फूर्तिदेवताच होती.'

'बिंदुसार पहिल्या दिवशी फुटाण्याची पुडी घेऊन मी पुलावर जायला निघालो तेव्हा मी उंबऱ्यात किंचित अडखळलो होतो.

कावराबावरा झालो होतो, रडवेला झालो होतो पण आईने माझ्या पाठीवर हात फिरवून मला चुचकारले व सांगितले–

‘ देवेंद्र, लक्ष्मी आणि सरस्वती या दोन्ही देवता माणसाची परीक्षा घेत असतात. विद्येची आराधना करताना ‘ ॐ भवति भिक्षांदेही,म्हणून निघताच आई सांगे, भीक मागायची लाज वाटता कामा नये. मधुकरीं वृत्तीने विद्येचा मध गोळा करता आला पाहिजे. तरच देवी सरस्वती प्रसन्न होते.

लक्ष्मीची जरा वेगळी तऱ्हा असते. साधारणत: सोन्यामोत्यांच्या रूपातली लक्ष्मी माणसाला समजते. पण कधी कधी ती कणसात लपून येते तर कधी फणसात लपून येते.

कुणी सांगावं–आपल्या घरी ती चण्याची पिवळी साडी–चोळी नेसूनही येणार असेल. मग तिच्या स्वागताला जाताना तोंड गोरंमोरं नको साजिरंगोजिरं असू दे. ओठ रडणारे नकोत, हसणारे असू देत.

तुझं नाव तुझ्या वडिलांनी देवेंद्र ठेवलं आहे. देवेंद्र रडतराऊ म्हणून घोड्यावर बसत नसतो, तर वज्र घेऊन ऐरावतावर आरूढ होत असतो. म्हणजे मग गजान्त लक्ष्मी दासी म्हणून पायाशी येते. ’ आणि मग नवी उमेद–नवा उत्साह घेऊन मी पुलावर चणे विकायला बाहेर पडलो. ’

‘ उद्योगाचे घरी ऋद्धीसिद्धी पाणी भरी या न्यायाने सरस्वती आणि संपत्ती, दोन्ही आपल्या घरी रहात आहेत काय आजोबा? ’ मी आजोबांचे पूर्वचरित्र ऐकून भारावून विचारले.

तेव्हा पुलावरच्या चणेवाल्यावरची आपली नजर चळू न देता ते कुठल्याशा तंद्रीत म्हणाले–‘ बिंदुसार, लक्ष्मीचा मद–घसरायला

लावी पद ! —असं कायसं म्हणतात. आई जग सोडून जाताना माझा हात हातात घेऊन म्हणाली—'

'काय, काय म्हणाली आजोबा माझी पणजी ?' मी उत्साहपूर्वक प्रश्न केला.

'ती म्हणाली, 'देवेंद्रा, माणूस येतो नि जातो. तशीच मी चालले आहे. या तुझ्या आईला विसरलास तरी चालेल पण देवेंद्रा, प्रत्यक्ष इंद्रपद मिळालं तरी त्या पहिल्यावहिल्या चण्याला विसरू नकोस.'

बिंदुसार, आईच्या त्या अखेरच्या उद्‌गारांची आणि माझ्या पहिल्या दिवसांची स्मृती कायम रहावी म्हणून रोज, अगदी रोज असा पुलावर येतो, या चणेवाल्याशेजारी उभा राहतो, घटकाभर चण्यांचा होतो, नव्हे, मी चणेवालाच होतो.

माझ्या आयुष्यातले हे क्षण माझ्या भूतकालाने मंतरलेले असतात. कारण त्या क्षणी मी बिस्टिबकांचा बडा कारखानदार नसतो तर दोन दोन पैशाला चण्याची पुडी विकणारा सामान्य पोऱ्या असतो—'

बोलता बोलता आजोबा उठले. चटकन त्या चणेवाल्याजवळ गेले आणि पाच पैशांची पुडी घेऊन त्याला अगदी लगटून, डोळे मिटून उभे राहिले.

मी ओळखले—भूतकालाने आजोबांच्या आयुष्यातली साठ–पासष्ट वर्षे चोरून नेली आहेत. त्या क्षणापुरते तरी आजोबा सुरुची आणि ममता बिस्किटांचे जनक राहिलेले नाहीत, तर दोन पैशांच्या—खूप खूप पुराण्या ढब्बू पैशाच्या चण्यांचे विक्रेते झालेले आहेत. अवाक् होऊन मी ती दिव्य समाधी पहात राहिलो—

★ ★ ★

# ५. संतर्पण




'येथे दूध विकत मिळणार नाही.'

—समोरच्या त्या वाड्याबाहेर पाटी लटकत होती. पाटी वाचून त्या गल्लीत नव्यानेच रहायला आलेल्या मला मोठ्ठं नवल

वाटलं ! अंगणात उघड्या दिंडीतून केवढं तरी गोधन दिसत होतं. चार-आठ धष्टपुष्ट गायी, दहाबारा गोजिरवाणे पाडे, दहाबारा चुणचुणीत कालवडी–त्यांना मारल्या जाणाऱ्या हेमावती–वासंती–नंदिनी–सीमंतिनी इ. राजस नावांच्या हाका, हंबरून-हुंबरून त्या हाकांना मिळणारी प्रत्युत्तरे, शेणागवताशी संबंध असूनही भोवतालचा तो स्वच्छ परिसर–

छे ! धंदेवाईक दुग्धालयाशिवाय गुराढोरांची इतकी शिस्तशीर काळजी कुठली घेतली जाणार, असं मला वाटताय तोच दारावरची ती पाटी पुन्हा ठळकपणे सांगून गेली–

'येथे दूध विकत मिळणार नाही.'

आमच्या घरासमोरच्या या वाड्यात पन्नास माणसं असतील तर घरातच सारं दुभतं लागेल म्हणून विक्री होत नसेल अशी मी माझी समजूत घातली असती. पण चारदोन गडीमाणसं, प्रौढ जोडपं आणि पाच-सहा वर्षांचं एक गुटगुटीत पोर याशिवाय त्या वाड्यात राहात असं कुणीच नव्हतं.

मग येवढं दूध...ही माणसं काय दुधाने आंघोळ करतात की अंगणातल्या केळीला पाण्याऐवजी दुधाचंच शिंपण घालतात ? की हा वाडा मुळात गोकुळातला होता व कोण्या उत्खननात तर या दृष्ट लागण्यासारख्या गोधनासकट, खिल्लारासकट भूमीवर सजीव प्रगट झाला नाही ना ? की विराटाच्या पळवून नेलेल्या अन् पार्थाने मुक्त करून आणलेल्या गाईंचा चुकूनमाकून बाजूला राहिलेला एखादा कळप तर इथे मी पहात नाही ना ?–उगीच खुळचा कल्पना डोकावून गेल्या.

ति. ४...

मी मनाशी असलं काही म्हणतेय तोच दहा-बारा पोरं धावत-पळत आली ती दिंडी पुरी उघडून अगदी हक्काच्या घरासारखी त्या वाड्यात शिरली. चार वर्षांपासून चौदा वर्षांपर्यंत सगळ्या उमरीचे, सगळ्या जातींचे बाळगोपाळ या मेळाव्यात होते. काही धडक्या कपड्यांचे, काही मळक्या धडोत्यांचे, काही तुळतुळीत गोट्यांचे तर काही कपाळभर जावळाचे. काही हसऱ्या मुद्रेचे तर काही रुसव्या चेहऱ्याचे, कुणाच्या हातात कानफुटका कप, कुणाच्या हातात वाडगा तर कुणाच्या हातात पाणी प्यायचं फुलपात्र-असं काही ना काही भांडही होतं.

ती सेना वाड्यातल्या अंगणात जाऊन उभी राहतेय तो एक हसतमुख प्रौढा ओसरीच्या वरच्या अंगाला येऊन उभी राहिली. मुलं मधाच्या घागरीभोवती मुंग्या जमाव्यात तशी या मधाळ हसणाऱ्या बाईभोवती 'माई–माई' करीत जमा झाली. भोवतालची ती दुधाची गंगा आणि वाराणशीसारखी ही माई–कान्ह्याच्या नंदामाईशी या माईचे नाते होते काय ?–उगीचच वाटलं.

थोड्याच वेळात एका गड्याने चांगले चार घागरींचे दुधाने काठोकाठ भरलेले पातेले माईच्या शेजारी आणून ठेवले. हातात भले थोरले ओगराळे घेऊन त्या बाळगोपाळांना माई दूध वाढू लागल्या. वाढता वाढता एकीकडे त्यांचे बोलणे चालू होते–'गणपा, गेल्या वर्षभर अर्ध्या वाडग्यात तुझं पोट भरताय हे बरं नाही हं. उद्यापासून नमस्कार घालायला लाग बघू म्हणजे वाडगाभर दूध घोटात संपवशील.'

दुसऱ्या एका मुलीला त्या म्हणाल्या–'सुमा, तुझं दूध पिऊन झालं की घरात येऊन लोटीभर दूध आईसाठी घेऊन जायचं. तुझ्या आईला बाळ होणाराय ना म्हणून रोजच न्यायचं हं.'

मी मनाशी असलं काही म्हणतेय तोच दहा-बारा पोरं धावत-पळत आली ती दिंडी पुरी उघडून अगदी हक्काच्या घरासारखी त्या वाड्यात शिरली. चार वर्षांपासून चौदा वर्षांपर्यंत सगळ्या उमरीचे, सगळ्या जातींचे बाळगोपाळ या मेळाव्यात होते. काही धडक्या कपड्यांचे, काही मळक्या धडोत्यांचे, काही तुळतुळीत गोट्यांचे तर काही कपाळभर जावळाचे. काही हसऱ्या मुद्रेचे तर काही रुसव्या चेहऱ्याचे, कुणाच्या हातात कानफुटका कप, कुणाच्या हातात वाडगा तर कुणाच्या हातात पाणी प्यायचं फुलपात्र-असं काही ना काही भांडही होतं.

ती सेना वाड्यातल्या अंगणात जाऊन उभी राहतेय तो एक हसतमुख प्रौढा ओसरीच्या वरच्या अंगाला येऊन उभी राहिली. मुलं मधाच्या घागरीभोवती मुंग्या जमाव्यात तशी या मधाळ हसणाऱ्या बाईभोवती 'माई–माई' करीत जमा झाली. भोवताLच्ची ती दुधाची गंगा आणि वाराणशीसारखी ही माई–कान्ह्याच्या नंदामाईशी या माईचे नाते होते काय?–उगीचच वाटलं.

थोड्याच वेळात एका गड्याने चांगले चार घागरींचे दुधाने काठोकाठ भरलेले पातेले माईच्या शेजारी आणून ठेवले. हातात भले थोरले ओगराळे घेऊन त्या बाळगोपाळांना माई दूध वाढू लागल्या. वाढता वाढता एकीकडे त्यांचे बोलणे चालू होते–'गणपा, गेल्या वर्षभर अर्ध्या वाडग्यात तुझं पोट भरताय हे बरं नाही हं. उद्यापासून नमस्कार घालायला लाग बघू म्हणजे वाडगाभर दूध घोटात संपवशील.'

दुसऱ्या एका मुलीला त्या म्हणाल्या–'सुमा, तुझं दूध पिऊन झालं की घरात येऊन लोटीभर दूध आईसाठी घेऊन जायचं. तुझ्या आईला बाळ होणाराय ना म्हणून रोजच न्यायचं हं.'

तिसऱ्या एका उघड्या अंगाने आलेल्या मुलाला त्या म्हणत होत्या–' तुम्ही सात भावंडे असून रोज एकदोन एकदोन वगळून काय म्हणून येता रे ? कुणातरी दोघांना आई घरी ठेवून घेते का रे ? उद्यापासून सगळी आली नाही तर कुणालाच दूध मिळणार नाही असं आईला सांग बरं का.'– हे असं तासभर चाललं. दुधाने न्हायलेली अशी हसरी सकाळ मी आयुष्यात पहिल्यांदाच पहात होते.

आणि काय आश्चर्य ! अशीच हसरी संध्याकाळ धान्याने माखलेली पाहण्याचा योग मला त्याच दिवशी त्याच घराने आणून दिला.

संध्याकाळी मावळतीचे रंग बघायला म्हणून गच्चीत आले तो समोरच्या वाड्याच्या गच्चीवर त्या सकाळच्या गड्याने ते सकाळचेच पातेले कसल्याशा धान्याने भरून आणून ठेवले. उन्हाळ्याचं काहीतरी वाळवण असेल म्हणून मी तिकडे लक्ष देणार नव्हते, तोच माई पदर बांधून तिथे आल्या आणि ओंजळी भरभरून धान्य त्या उघड्या गच्चीच्या फरशीवर फेकू लागल्या.

मला काही उलगडाच होईना. तेवढ्यात फड् फड् फड् असा माथ्यावर आवाज आला. कबुतरांचा केवढा तरी थवा कुणी आवर्जून बोलावणं पाठवल्याप्रमाणे अलगद त्या गच्चीत उतरला. माना मुरडून मुरडून त्या गच्चीत धान्य टिपू लागला. माई तिथेच होत्या. पण त्या धिटुकल्यांची ती जशी मावशीच होती व तिनेच तो खाऊ त्या भाचरांना वाटला होता. अगदी अशा थाटात त्यांनी तो खाऊ मटकावला व ते वाऱ्यावरचे सैन्य पुन्हा वाऱ्यावर स्वार होऊन निघून गेले.

पुन्हा ओंजळी भरभरून माईंनी धान्याचा दुसरा हप्ता टाकला आणि ओहो! कधी काळी कुणाच्या पिंजऱ्यात चुकूनमाकून दिसणाऱ्या राघूचे पाचपंचवीस भाईबंद आपली हिरवी-तांबडी निशाणे फडकवीत आले. त्यांनीही त्या सदावर्तात निर्भयपणे डुंबून घेतले व मग तो थवा पश्चिमेकडे झुकला. मग गल्लीतल्या पोरांचे आवाज आले—

‘ वानरा वानरा, हुप् हुप्...
तुझ्या शेंडीला शेरभर तूप ’

एखादे चुकार वानर आसपास आले असेल म्हणून मी कावरी-बावरी होऊन आमच्या गच्चीत सावधपणे बघू लागले तो काय आश्चर्य ! चांगली दहाबारा वानरे—त्यांत एकदोन बाळंतिणी, त्यांची उनाड पोरे, एक भलामोठा म्हातारा म्होरक्या—येवढा सारा लवाजमा त्या समोरच्या गच्चीत उतरला. आणि रामाचे ते सेवक त्या माउलीच्या हातचा प्रसाद खाऊन दिवस बुडायला आला तेव्हा रस्त्यावरच्या पोरांना वाकुल्या दाखवीत पसार झाले.

रिकामे झालेले पातेले घेऊन परत निघालेल्या माई मला गच्चीवरील संधिप्रकाशात दिसल्या तेव्हा मला वाटलं त्या पातेल्या-तलं धान्य संपलं तरी त्याची जागा पुण्य बळकावून बसलं आहे, आणि त्या दानशूरेचा गौरव करण्यासाठी संध्येने आपल्या तबकातला कितीतरी गुलाल माईंच्या अंगोपांगावर उधळून दिला आहे.

रात्री विचार करता करता वाटलं, आज दानधर्माला योग्य अशी एखादी खास तिथी असावी आणि म्हणूनच येवढे हे अन्नसंतर्पण, दुग्धसंतर्पण झाले असावे.

पण मग सकाळची बाळगोपाळांची व संध्याकाळची मुक्या प्राण्यांची अंगतपंगत समोर रोजच झडू लागली तेव्हा माझे कतूहल जागे झाले.

वाटलं—या मागे काहीतरी खास इतिहास असावा. त्या दुधाच्या कावडीत कुठलासा भूतकाळ हिंदकळत असावा. त्या धान्याच्या पातेल्याला कुठलासा धागादोरा चिकटलेला असावा.

बायकांचा संबंध सुईदोऱ्याशी असतो ना—त्यामुळे शिवणातलाच नव्हे तर प्रसंगातलाही धागादोरा धुंडाळायची त्यांना खोडच जडून जात असावी. मी तरी त्याला अपवाद कशी ठरणार ?

आणि खरोखरच तो धागा अनाहूतपणे पुढच्याच आठवड्यात माझ्या हाती आला.

त्या दिवशी आमचा गवळी आला नाही. गावात फेरी मारूनही बाळासाठी गाईचं दूध काही मिळू शकलं नाही. सव्वा वर्षाच्या या पोराची कासाविशी मला आधीच दिसू लागली. नव्या दातांची तक्रार सुरू झाल्याने म्हशीचं दूध पाजायला जीव धजेना.

या काळजीत मी असताना समोरच्या वाड्यातल्या गाईंच्या गळ्यांतल्या घंटा रुमझुमल्या. वासरांच्या आयांनी मला जणू हाकच मारली. मला राहवेना. स्वयंपाकघरात जाऊन हातात पातेलं घेतलं व तडक समोरच्या वाड्याकडे निघाले. बाळाला संभाळणाऱ्या यांनी रुपयाची नोट माझ्यापुढे टाकून बजावले—

'रुपयाचं जेवढं मिळेल तेवढं दूध घेऊन ये.'

मी रुपाया कनवटीला लावून निघाले खरी पण आत शिरताना वाड्यावरची—'येथे दूध विकत मिळणार नाही'—ही पाटी जशी डोळे वटारून माझ्याकडे पाहू लागली. तिच्याकडे बघितले न बघितलेसे करून मी आत शिरले. तडक ओटी चढले व माज-

घराच्या दाराशी जाऊन उभी राहिले. आतून स्निग्ध आवाजात विचारणा आली–

'आत या ना, अशा बाहेर का उभ्या? समोरच्या जोशीणबाई ना तुम्ही?'

'हो.'

दुधाला जाऊन भांडे लपवण्याचा छद्मीपणा मी केला नव्हता. माझ्या हातातल्या पातेल्याकडे पाहून त्या म्हणाल्या– 'दूध का हवाय? द्या ते पातेलं इकडे. किती–भरूनच देऊ काय?'

'हो, म्हणजे तसं…तसं….भरूनच हवाय, शेराची पातेली आहे. पण…भाव काय?'

'म्हणजे? तुम्ही लिहायवाचायला शिकला नाहीत वाटतं?'

'चांगली इंटरपर्यंत शिकलेय की मी.'

'तसं नाही. बाहेरची पाटी वाचली नाहीत वाटतं? आम्ही दूध विकत नसतो.'

'पण आम्हालाही काही फुकट घ्यायची सवय नाही.' हातातील नोट पुढे करीत मी म्हणाले,

'आम्हालाही काही विकत देण्याची सवय नाही.' त्यांनी तितकंच ठासून सांगितलं.

तेवढ्यातच पाचसहा वर्षांचा एक गुटगुटीत छोकरा आला. मला पाहून किंचित दचकला पण मग एकदम आईच्या कमरेला विळखा घालून म्हणाला–

'आई–किती ग वाट पहायची? गंग्या–रुंग्या–येशी--केशू--दादू–कमळी–सगळी सगळी दूध न्यायला कधी ग येणार?'

'हे बघ, तू दादूकडून चटकन अंघोळ करून घे. तोपर्यंत येतील हं. असं पारोशानं दूध दिलंस तर आपलं गोरं गोरं दूध काळं

होईल ना!' हे त्याला एकदम पटलं असावं. आईची मिठी सोडून ते पिल्लू पळत स्नानगृहाकडे पळाले.

'बसा ना अशा. मी तुम्हाला काही सांगणार आहे. हा आत्ता गेला ना--तो माझा एकुलता एक मुलगा– दीपक. लग्नानंतर पंचवीस वर्षांनी झालेला.'

'मग येवढ्या उशिरा झालेल्या या बाळासाठी तर पैसा गाठी लावायलाच हवा आपल्याला'–असं म्हणून मी रुपाया पुन्हा पुढे केला.

'तेच सांगायचाय मला. एरवी घेतला असता पण बाळासाठीच घेता येणार नाही.' मी मुद्रा प्रश्नांकित केली.

'बसा ना जरा. मी थोडक्यात सांगते. दामू, जा रे हे पातेलं समोरच्या जोश्यांकडे पोचव, नि म्हणावं बाई पाच मिनिटांत येतायत.'

–असं म्हणून माझ्या हातातल्या पातेल्यात अगदी गळ्यापर्यंत दूध घालून त्यांनी ते माझ्या घरी पाठवून दिले.

माझा मग नाइलाज झाला. मुकाट्याने नोट कनवठीला लावली. जीभ टाळूला चिकटवली व समोरच्या झोपाळ्यावर बैठक मारली.

'लग्नाला सात वर्षे झाली तरी आमच्या घरात पाळणा हलला नाही. हे एकुलते एक आणि असे निपुत्रिक म्हणून घरात सर्वांना भारी वाईट वाटे. पण मी लाडकी असल्याने मला दुःख होईल म्हणून कुणी काही बोलत नसे. नातवंडाची आशा करीत सासू–सासरे गेले! लग्नाला दहा वर्षं झाली तरी तीच गत! घरातच चिमणं बाळ नसल्यानं इतरांची तरी चिमणी बाळं या घरी कशी

यावीत ? मला तर वासरांचा–पाखरांचा–पोरांचा भारी भारी ओढा वाटे.

‘ शेवटी मी एक चांगल्या जातीची गाय-नव्याने व्यायलेली– गोंडस वासरू असलेली–खरेदी केली. आणि धारेच्या वेळी आळी-तल्या बाळांना बोलावून–विशेषतः गोरगरिबांच्या व गरजू मुलांना शोधून आणून ते दूध फुकट पाजू लागले. ते दुभते गाय-वासरू नि त्या दुधाने धापलेले माय-लेकरू पाहिले की माझ्या मनातल्या वात्सल्याच्या शुष्क झऱ्यातून जसं सहस्रधारांनी पाणी खळखळू लागे. मन तृप्त होऊन सांगे–पुनःपुन्हा सांगे....

–‘ हा अंगणातला वात्सल्याचा वृक्ष तोडू नको, खुडू नको. असाच उभा वाढू दे. आडवा वाढू दे, तुझीच दृष्ट त्याला न लागू दे.’

‘ –आणि मग एका कालवडीच्या दोन, दोहोंच्या चार झाल्या तरी मी माझा नेम मोडला नाही. धंद्यात यांचीही बरकत होत गेल्याने हेही माझ्या संकल्पाच्या आड आले नाहीत.’

‘ या गुरापोरांप्रमाणे गच्चीवर पाखरांना–’

मी मध्येच शंका विचारली.

‘ होय. म्हटलं दारच्यांची व घरच्यांची दया केली, मग झाडा-वरच्यांची दया कोण करणार म्हणून मग रोज दोन पायलीचा चिमणचारा त्यांनाही घालते.’

न राहवून मी म्हटलं–‘ तुमची ही मूक सेवा देवाघरी रुजू झाली म्हणून त्याने दीपक तुमच्याकडे पाठवला.’

‘ होय. पंचवीस वर्षांनी मला दिवस गेले तेव्हा हे मला म्हणाले, ‘ तू वासरांची–पाखरांची येवढी चांगली मानलेली आई झालेली पाहून तुला खरीखुरी आई करायला हरकत नाही असा विश्वास

विधात्याला झाला असावा.'–अन् तुम्हाला सांगते–दीपक झाल्या-वरही मी मांडलेलं हे गोकुळ मला मोडवेना. वाटलं–ज्या गोपाळांना भुलून हा गोपाळकृष्ण माझ्या घरी आला त्यांना डावलणं आता पाप आहे–महापाप आहे.'

भारावून जाऊन मी म्हणाले– 'दानाची अक्षरं कृतीच्या लिपीत लिहिली जातात. घेणारे हजार असतात तर देणारे चारही नसतात. त्यातही मूठभर दानाची खंडीभर वरात काढणारे महाभाग जास्त. पण खऱ्या दानाला नकोत नगारे! नकोत हारतुरे! उजव्या हाताच्या दातृत्वाची बातमी त्याच्या सख्ख्या भावाला-डाव्या हाता-लाही लागायची नाही, मग इतर गोतावळ्याची गोष्टच कशाला? याचकाच्या नेत्रांतले समाधानाचे अर्घ्य त्याला मिळाले म्हणजे दात्याची सेवा भरून पावते. तुमच्या दानाची जात मला हीच दिसते.'

तेवढ्यात दीपक आंघोळ करून आला व आईच्या अंगाचा घुसळखांबा करून म्हणाला–

'चल ग माई लवकर अंगणात सगळी सगळी जमली बघ.'

माईंना हसून निरोप देऊन मी त्या अंगणातल्या गोकुळाला न्याहाळीत घरच्या कान्ह्याकडे धावले. पण रस्ताभर ती गोकुळची गौळण नि तिच्या हातातली ती दुधाची माथण दिसत होती.

तेव्हापासून आमच्या घरातल्यांना समोरच्या वाड्यातला शेणामातीचा वास आला तरी मला मात्र त्यात उंची अत्तर कालवल्याचा चांगला भास होतो!

★ ★ ★

# ५. गाऱ्या गाऱ्या भिंगोऱ्या

छोटया मोहनला अगदीच करमेना. त्याला कळपातून चुकलेल्या हरिणशावकासारखे एकएकटे वाटू लागले. आजच नव्हे तर पुष्कळदा त्याला असे वाटत असे. त्याच्या मनाचे फुलपाखरू नेहमीच कुठल्याशा फुलावर झेपावण्यासाठी धडपडत असे. आणि मग घरात बाबासाहेबांच्या वा आईसाहेबांच्या शिस्तीच्या दोऱ्याने त्याचे चिमणे पाय बंगल्याच्या चार भिंताडांत जखडले जात असत. आज बाबासाहेब नि आईसाहेब घरच्या गाडीतून कुठेसे पार्टीला गेले होते. घरात मोठ्ठं वा धाकटं भावंड नव्हतंच. आणि कुणी मित्रपरिवारही नव्हता. सहा वर्षांच्या मुलाला मित्र नसतात असं नाही, पण नव्हते. किंबहुना जाणूनबुजून करून दिले नव्हते!

आईसाहेबांना वाटे–' माझा मोहनराव मोठ्या घरचा एकुलता एक पुत्र. आमच्या योग्यतेहून फडतूस पोरांत तो मिसळणे हे आमच्या घराण्याला कमीपणा आणणारं आहे. सामान्य माणसाशी त्याने मैत्री करणे म्हणजे आभाळीच्या चंद्राने जमिनीवरच्या फत्तराशी मैत्री करण्यासारखे आहे.'

म्हणूनच त्यांनी केवळ मोहनरावाच्या तैनातीला 'खाशाबा'ची खास नेमणूक केली होती. पण खाशाबा हा किती झाले तरी प्रौढ आणि नोकर. त्याच्या नि मोहनच्या आवडी-निवडी कशा मिळत्या–जुळत्या होणार ? सकाळ आणि दुपार यांची का कुठे मैत्री होत असते ? तरी पण खाशाबा हरतऱ्हेने मोहनचे मन रंजवायचा प्रयत्न करी. तो त्याला शाळेत पोचवायला जाई. शाळा चारच तास असे. पण मधल्या सुट्टीत हे रत्न इतर दगडांत न मिसळावे असा आईसाहेबांचा कटाक्ष असल्यामुळे खाशाबा तिथेही त्याला सोबत करी, नव्हे राखण करी! संध्याकाळी लाकडी घोड्यावर त्याला अश्वारोहण करायला लावी. तिचाकीवरून बंगल्याच्या गच्चीवर चकरा मारायला शिकवी. स्वतःवर कायम राज्य घेऊन त्याच्याशी शिवाशिवी खेळे. स्वतः कायम गड्डेपणा स्वीकारून त्याच्याशी झब्बू खेळे. मोहन दमला की रेशमी गादी व मखमली गिरदी त्याच्या सेवेला हजर ठेवी.

पण मोहन...मोहन...पिंजऱ्यांतल्या राघूचे चित्त आभाळात झेपावत असते, तसे या बंगल्यातल्या राघ्याचे चित्त घराबाहेर भिरभिरत असे. हातात रोजरोज दिला जाणारा बर्फीचा तुकडा भिरकावून कोपऱ्यावरच्या झोपडीतल्या त्याच्याच वयाच्या राघू-कडन चिंचेचे लालचुटूक बुटूक मागायला त्याचे हात नेहमी शिवशिवत असत. तर अंगावरचा रेशमी सूट आणि पायांतले

जरीचे चढाव फेकून देऊन शेजारच्या वाण्याच्या फुलचंदच्या गळचात गळा घालून कोपऱ्यावरच्या खाडीच्या वाळूवर जाऊन मनमुराद नाचण्यासाठी त्याचे पाय आसुसत असत.

आईसाहेबांना वाटे–पैशाने विकत घेण्यासारखी सारी सुखे द'सीबटकीसारखी हात जोडून मोहनरावाच्या पायी गालिच्या-सारखी लोळण घेताहेत. तेव्हा माझ्या बछडचाला कसली उणीव आहे ?

पण त्यांना कळत नसे की दुसऱ्याचे सुख स्वतःच्या मापाने मोजू नये. कारण ज्याचा त्याचा सुखाचा स्वतंत्र ताजवा असतो, तागडी असते, म्हणूनच त्या जरी सुखी म्हणून संबोधित होत्या तरी मोहनराव दुःखीच होता.

आज तर मोहन कमालीचा बैचैन झाला. त्याच्या मनःस्वास्थ्याचे मोती एकटेपणाच्या जाणिवेने घरंगळत गेले. तो बंगल्याच्या गच्चीत आला.

आणि ओ हो–

आकाशाकडे पाहता पाहता त्याचे भान हरपले. आभाळात ढगांची कितीतरी बाळे जमली होती. कुणी घोडचावर स्वार होऊन, कुणी हत्तीवर आरूढ होऊन, तर कुणी रथावर चढून; आणि कोण त्यांचा धांगडधिंगा–गुरुजी नसलेला वर्गच जणू ! एकमेकांशी कुस्ती काय खेळत होते, वेडचावाकडचा कविता काय बडबडत होते, मधेच खिशातली भिंगे काढून एकमेकांचे डोळे काय दिपवीत होते, एकमेकांच्या अंगावर फवारे काय उडवीत होते, पळापळी काय करीत होते !

मोहनला वाटले– अहाहा ! असं कुणी वडील माणूस चूप बसवायला नसताना मोकळेपणी धावण्यापळण्यात काय मजा

असेल! पाण्याच्या फवाऱ्याखाली अंग भिजवण्यात काय मजा असेल! ह्या पाण्याच्या आभाळातल्या कारंज्याखाली गाऱ्या गाऱ्या भिंगोऱ्या करण्यात काय आनंद असेल!

पण मला कोण अंगणात जाऊ देणार? आईसाहेब नि बाबासाहेब नसले तरी हा खाशाबा–त्याच्या मिठीतून सुटका होईल तर ना! खरंच, या खाशाबाला थोडा वेळ झोप कशी येत नाही? रोजच्याप्रमाणे शेजारच्या बंगल्यातल्या जिवाकडे तो पान खायला कसा जात नाही? का? का?

पण परमेश्वराने त्या बालजीवाची प्रार्थना ऐकली असावी. कारण खाशाबा त्याच्याजवळ येऊन म्हणाला–

'मोहनराव, वाईच संडासाला जाऊन येतो मी, तवर पावसाची गंमत पघत बसा.'

खाशाबा गेला मात्र–

पिंजऱ्याचे दार उघडे राहिलेले पाहून पोपट निसटला! मोहन जो धावला तो थेट बागेतल्या हिरवळीवर गेला. त्याचा उल्हास त्यालाच माहीत. मुक्तीच्या आनंदाने त्याच्या मनाचा घडा नाहून निघाला. खाशाबाच्या सहजी नजरेस न येईल अशा बेताने आंब्याच्या पलीकडे तो गेला, आणि मग स्वतःचे हात पसरून त्या आनंदाने वेडावल्या जिवाने गाऱ्या गाऱ्या भिंगोऱ्या करायला सुरुवात केली. पावसाचा तो ताजा शिपकारा अंगावर घेता घेता त्या बालजीवाची केवळ आजचीच नव्हे तर कित्येक दिवसांची तगमग शांतावली.

पहिल्या पावसाचा तो मादक गंध लुटता लुटता त्याच्या बंडखोर हृदयाने आईसाहेबांच्या चांदीच्या पेटीतल्या शेकडो अत्तराच्या कुप्या जणू भिरकावून दिल्या. हवेतला उन्मादक गारवा

अनुभवता अनुभवता त्याच्या प्रज्ञेने बंगल्याच्या आढ्याला अष्टौप्रहर भिरभिरणाऱ्या विद्युतविंझणांची जणू मोडतोड करून टाकली !

त्याला वाटले–मी मोहन नाही. मीही या मेघांशी हुंदडणारा मेघच आहे. मग मेघ फिरायला लागले की हा फिरे. ढग गडगडायला लागले की हा बडबडे. मेघांनी विजेच्या नेत्रांची उघडझाप केली की हाही स्वतःच्या नेत्रांची उघडझाप करी.

या आनंदाच्या बेहोषीत त्याचे चित्त किती वेळ गुरफटले असते कुणाला ठाऊक. पण तेवढ्यात गाडीचा कर्णा वाजला आणि आईसाहेबांच्या वक्रदृष्टीला न दिसण्याचे सर्व प्रयत्न निष्फळ ठरून तो त्यांना दिसलाच. धावत येऊन त्यांनी त्या ओलेल्या मोहनला पकडले. हिरव्या चरणीवरून माघारी यायला नाराज असणाऱ्या वासराप्रमाणे मोठ्या नाराजीने मोहन परतला. तरी त्याचे चित्त पावसातच होते. ते अजूनही मेघांशी लपाछपी खेळत होते, ते अजूनही मेघांशी पळापळी खेळत होते, ते अजूनही गाऱ्या गाऱ्या भिंगोऱ्या करीत होते.

खाशाबावर तोफ डागीत आईसाहेबांनी मोहनचे अंग पुसले, केस नीट केले, आणि तो नको नको म्हणत असताही रेशमी बिछायतीवर त्याला अळेबळे झोपवले. मोहनच्या हिशेबी तो रेशमीपणा मघाच्या हिरवळीहून छपन्नपटीने खडबडीत होता ! नंतर त्याला केशर घातलेले गरम गरम आटीव दूध जवळजवळ नाक दाबून पाजण्यात आले. मोहनच्या हिशेबी मघाशी सहजासहजी तोंडात पडलेल्या पावसाच्या थेंबाचा गोडवा या दुधालाही भारी होता !

पण आईसाहेब त्याच्या अंतर्मनाच्या कुरकुरीकडे थोडेच लक्ष देणार ? त्या स्वतःच्या तब्बेतीप्रमाणे त्याच्याशी वागत होत्या.

स्वतःच्या रीतीप्रमाणे एक वेळ पुस्तकातले गणित सुटेल पण स्वतःच्याच रीतीप्रमाणे दुसऱ्याच्या सुखाचेही गणित सुटेलच असे नाही ! मोहनच्या सुखाचे गणित तरी आईसाहेबांच्या रीतीने खासच सुटण्यासारखे नव्हते.

रात्री मोहनला फणफणून ताप भरला. त्याच्या उशाशी बसल्या बसल्या आईसाहेब बाबासाहेबांना म्हणाल्या.–

'बघितलंत, भाजल्या लाहीसारखा मोहनराव फणफणलाय ! मघाशी आपण नसताना पावसात हुंदडला ना, त्याचा परिणाम आहे हा, दुसरं काय !'

बाबासाहेबांनी त्याला दुजोरा दिला–

'आपण म्हणता तेच बरोबर ! पावसात हवे तसे खेळल्या-मुळेच मोहनराव तापलाय.' पण–पण खुळे बाबासाहेब नि त्याहून खुळचा आईसाहेब ! दोघांपैकी एकालाही उमगले नाही की मोहन तापाने फणफणला खरा, पण–पण तो पावसात हवे तसे खेळल्या-मुळे नव्हे तर पावसात हवे तसे न खेळल्यामुळे, केवळ न खेळल्या-मुळेच !

★ ★ ★

म. ग्रं. सं. ठाणें, बालवाङ्मय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
हा. क्र. 9084 दिनांक ......
विषय किशोर क्र. ५८2

## योगिनी जोगळेकर यांचे प्रकाशित वाङ्मय

| | |
|---|---|
| **कादंबरी** | **कथासंग्रह** |
| वादळ फूल | झुंजुमुंजू |
| गूलबाक्षी | प्राची |
| कचबंध | उर्मी |
| नादब्रह्म | जाग |
| ज्योतिर्मयी | शिलंगण |
| अक्षम्य | ओटी |
| एक मोठा एक छोटा | — |
| हार–जीत | **नाटक** |
| ओढ | रंगात रंगला श्रीरंग |
| **काव्य** | **किशोर वाङ्मय** |
| रिमझिम | मातृमेवा |
| आंबट चिंबट | गुरू शिष्य |
| सुरगंधा | खंडू खोडसाळे |
| | तिळगूळ |

BVBK-0401085